दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादकः बाळासाहेब मस्के

बीड | शुक्रवार,दि.१६ मे २०२५ | वर्षे४थे | अंक२७१वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष बाळासाहेब भगवानराव मस्के

बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष बाळासाहेब भगवानराव मस्के

## सरन्यायाधीशांची काल शपथ, आज निकाल

# नारायण राणेंना दणका



पुण्यभूमी प्रतिनिधी

दिल्ली:देशाचे ५२ वे सरन्यायाधीश म्हणून शपथ घेतल्यानंतर भूषण गवई यांनी पहिलाच निकाल महाराष्ट्रातील प्रकणावर दिला आहे. विशेष म्हणजे तत्कालीन महसूलमंत्री नारायण राणेंना दणका देत सरन्यायाधीशांनी ३० वर्षांपूर्वीच्या खटल्यात महत्त्वाचे निर्देश दिले आहेत. सन १९९८ साली युती शासनाच्या काळात नारायण राणे हे महसूल मंत्री असताना वन विभागाची ३० एकर जमीन बिल्डरला देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. सरन्यायाधीश भूषण गवई यांनी राणेंनी घेतलेला हा निर्णय रद्द केला आहे. तसेच, पुण्यातील ती जमीन पुन्हा वन विभागाला देण्याचे आदेशही त्यांनी दिले आहेत. त्यामुळे, सरन्यायाधीशांच्या पहिल्याच निर्णयात भाजप खासदार आणि माजी मुख्यमंत्री नारायण राणेंना दणका बसला आहे. नारायण राणे हे महसूल मंत्री असताना वन विभागाची ३० एकर जमीन बिल्डरला देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. सरन्यायाधीश भूषण गवई यांनी राणेंनी घेतलेला हा निर्णय रद्द केला आहे. तसेच, पुण्यातील ती जमीन पुन्हा वन विभागाला देण्याचे आदेशही त्यांनी दिले आहेत. त्यामुळे, सरन्यायाधीशांच्या पहिल्याच निर्णयात भाजप खासदार आणि माजी मुख्यमंत्री नारायण राणेंना दणका बसला आहे.

### मिलीभगत पाहून सरन्यायाधीशांनी खडसावलं

### ३० वर्षांपूर्वीच्या खटल्यात महत्त्वाचे निर्देश

### देशातील सर्वच राज्यांना दिले आदेश

भुषण गवई यांच्यासह तीन न्यायाधीशांच्या खंडपीठाने पुण्यातील ३० एकर जागा वन विभागाला परत देताना संपूर्ण देशात ज्याचा दूरगामी परिणाम होईल असा निर्णय दिलाय. देशातील सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांच्या मुख्य सचिवांना सर्वोच्च न्यायालयाने आदेश देऊन त्यांच्या राज्यात अशाप्रकारे वन विभागाच्या जमीनी हडप केल्या गेल्या असतील तर त्याचा तपास करण्याचे आदेश दिले आहेत. या जमीनी १ वर्षाच्या आत पुन्हा सरकारजमा करुन घेण्यात याव्यात असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटलंय जर जमिनीवर बांधकाम उभे राहिल्याने जमीन परत घेणं शक्य नसेल तर बाजारभावाप्रमाणे मोबदला वसुल केला जावा, असेही सर्वोच्च न्यायालय म्हटलं आहे.

**काय आहे हे संपूर्ण प्रकरण :** पुण्याच्या कोंढवा भागातील ३० एकर जागा वन विभागाची असताना देखील ती चव्हाण नावाच्या व्यक्तीला देण्याचा निर्णय नारायण राणे यांनी १९९८ साली महसूल मंत्री या नात्याने घेतला होता. ही ३० एकर जागा आपली शेतजमीन असल्याचा दावा चव्हाण नावाच्या व्यक्तीने केला होता. मात्र जमीन ताब्यात येताच चव्हाण नावाच्या व्यक्तीने ही जागा रिची रीच सहकारी संस्थेला दोन कोटींना विकली विकली.

### बिगर शेती असल्याचे प्रमाणपत्र

आश्चर्य पुढच्या काही दिवसांमध्ये त्यावेळचे पुण्याचे विभागीय आयुक्त राजीव अग्रवाल, जिल्हाधिकारी विजय माथनकर आणि उपवन संरक्षक अशोक खडसे यांनी ही जागा बिगर शेती असल्याचे प्रमाणपत्र दिले. ज्यामुळे या जागेवर बांधकाम करण्याचा मार्ग मोकळा झाला.

## डोनाल्ड ट्रम्प फडणवीसांचे कुलदैवत

राजकीय:संजय राऊतांची भाजपवर सडकून टीका



पुण्यभूमी प्रतिनिधी

मुंबई:पहलगाम येथील हल्ल्यानंतर भारताने राबवलेल्या 'ऑपरेशन सिंदूर'मुळे दहशतवादाचे कंबरडे मोडण्याचे काम भारतीय लष्कराने केले आहे. या कामगिरीबद्दल लष्कराचे आभार व्यक्त करणे आणि त्यांचा सन्मान करण्यासाठी महायुतीतर्फे 'तिरंगा यात्रे'चे आयोजन केले होते. या यात्रेवरुन आता ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी भाजपावर निशाणा साधला आहे. डोनाल्ड ट्रम्प मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचे कुलदैवत असून गावागावात डोनाल्ड जत्रा भरवा अशी टीका खासदार राऊत यांनी केली.

खासदार संजय राऊत यांनी आज पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्यांनी महायुतीतर्फे घेण्यात आलेल्या तिरंगा यात्रेवर टीका केली खासदार राऊत म्हणाले, तिरंगा यात्रा काढण्याचे कारण काय? कसले श्रेय? शस्त्रसंधीचं आणि माघारीचे श्रेय का? युद्धविराम, माघार, शस्त्रसंधी हाच विजय मानून एक पक्ष एका देशामध्ये विजय सोहळा साजरा करतो. युद्धविराम ट्रम्प यांच्या माध्यमातून झाला. या लोकांनी अमेरिकेचा झेंडा हातात घेऊन डोनाल्ड यात्रा काढली पाहिजे, असा टोला राऊत यांनी लगावला.देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे, जेपी नड्डा यांनी डोनाल्ड यात्रा काढली पाहिजे. गावागावात डोनाल्ड जत्रा भरवावी आणि त्यांनी सांगा आमचे कुलदैवत डोनाल्ड आहे, एकनाथ शिंदे यांनी देखील डोनाल्ड यात्रा काढावी. त्यांना कळतं का? युद्धबंदी, शस्त्रसंधी काय असते? आमदार-खासदार विकत घेऊन सरकार बनवण्या इतकं सोपे आहे का? ते निवडणूक आयोगाला हातात धरून पक्ष ताब्यात घेण्या इतके सोपे नाही. युद्धाच्या मैदानातून तुम्हाला खेचले आहे. आता टेंभी नाक्यावर पान २ वर

## ...क्लासेसचा किती हप्ता भेटतो?

चर्चा:शिक्षकांचा क्लासेसवर भर शाळेच्या नावाने बोंबाबोंब?



पुण्यभूमी प्रतिनिधी

केज:तालुक्यातील खाजगी बोगस कोचिंग क्लासेस बंद कधी होणार असा प्रश्न नागरिकांना पाल्यांना पडला आहे. व त्यांत शाळेतील शिक्षकांना तर क्लासेस घेतल्या शिवाय जमत नाही. तसेच क्लासेसच्या विद्यार्थी विद्यार्थीनीना सौचालयाची गौरसोय होत आहे. शाळेतील शिक्षकांनी तर क्लासेसचा जास्त बाजार मांडला आहे शाळेतील शिक्षकांना क्लासेस मुळे नोकरी करण्यासाठी वेळ मिळत नाही व पगारी साठी काही शिक्षक नावाला नोकरी करत आहेत तर काही शिक्षक तर पगार उचल्या साठी शाळेत सहीला जातात व नंतर क्लासेस कडे लक्ष आहे. त्यांमुळे या क्लासेस ला कुणी मालक आहे का नाही असा प्रश्न नागरिकांना पडला आहे. व संमंदीत अधिकाऱ्यांना केज तालुक्यातील कोचीग क्लासेसचा कीती हप्ता भेटतो असा प्रश्न नागरिकांना पडला आहे. जेने करून कुठलाही अधिकारी यांच्या कडे लक्ष देत नाही दुर्लक्ष करत आहेत त्यामुळे अधिकाऱ्यांना कोचिंग क्लासेसचा हप्ता भेटतो की पान २ वर

## मतदार संघाला सोडले वाऱ्यावर!

सवाल:आ.नमिता लोखंडे दिसेना झाल्या



पुण्यभूमी प्रतिनिधी

केज:केज अंबाजोगाई मतदार संघातील जनता वाऱ्यावर सोडून आमदारा नमीता लोखंडे कुठे गायब झाल्या आहेत काही कळेना जनतेला वेड्यात काढुन आमदारा नमीता लोखंडे फरार झाल्या आहेत का असा प्रश्न नागरिकांना पडला आहे जनतेने लोकप्रतिनिधी म्हणून निवडून दीले आहे व आमदारा नमीता लोखंडे तिकडे मुंबई पुण्याला दौऱ्यावर तोऱ्यात मौज मजा करत फिरताना दिसत आहे जर लोकप्रतिनिधी जर रोजच मौज मजा करत जर फिरल्या तर असे समजले जाते की आमदारा नमीता पान २ वर

## भारताने दिला तुर्कीला दणका

देशविदेश:पाकला साथ देणे भोवले



पुण्यभूमी प्रतिनिधी

दिल्ली:पाकिस्तानसोबतचे संबंध ताणले गेलेले असताना भारत सरकारने तुर्कीला मोठा दणका दिला आहे. तुर्कीला पाकिस्तानला साथ देणे भोवले असून, याच कारणावरून भारताने देशातील प्रमुख विमानतळांवर ग्राऊंड हँडलिंग सेवा देणारी तुर्की कंपनी सेलेबीची सुरक्षा मंजुरी तात्काळ रद्द केली. राष्ट्रीय सुरक्षेच्या कारणास्तव हा निर्णय घेण्यात आल्याचे ब्युरो ऑफ एव्हिएशन सिक्युरिटीने म्हटले आहे. याबद्दलचा अधिकृत आदेश आज जारी करण्यात आला.

भारत आणि पाकिस्तानमधील अलिकडच्या लष्करी संघर्षादरम्यान तुर्कीने उघडपणे पाकिस्तानला पाठिंबा दिला. भारतीय सैन्याने पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील दहशतवादी तळांवर केलेल्या कारवाईवरही तुर्की सरकारने टीका केली होती. एवढेच नव्हे, तर पाकिस्तानी सैन्याने भारताविरोधात कारवाया करताना तुर्कीच्या ड्रोन्सचाच वापर केला होता. यामुळे भारत आणि तुर्कीमधील संबंधात पुन्हा एकदा कटुता निर्माण झाली आहे. त्यामुळे पाकिस्तानला जाहीर समर्थन देणाऱ्या तुर्कीच्या कंपनीला आता भारताकडून झटका देण्यात आला.

नागरी विमान सुरक्षा ब्युरोने यासंदर्भात एक आदेश जारी केला असून, त्यानुसार सेलेबी एअरपोर्ट सर्व्हिसेस इंडिया प्रायव्हेट लिमिटेडला विमानतळांवर ग्राऊंड हँडलिंग सेवा देण्यासाठी दिलेली मंजुरी तात्काळ रद्द केली. २१ पान २ वर

निर्णय | सरन्यायाधीश भूषण गवईंचा आदेश

## मराठा आरक्षणासाठी नवे खंडपीठ



पुण्यभूमी प्रतिनिधी

दिल्ली:नवी दिल्ली : मराठा आरक्षण संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांना याचिकांवर जलद सुनावणीसाठी नवीन खंडपीठ स्थापन करण्याचे निर्देश दिले. सरन्यायाधीश बी. आर. गवई यांच्या पहिल्याच कामकाजाच्या दिवशी हा महत्त्वपूर्ण आदेश दिला.

सरन्यायाधीश बी. आर. गवई आणि न्यायमूर्ती ऑगस्टीन जॉर्ज मसीह यांच्या द्विपीठासमोर ही सुनावणी झाली. सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गीय एससीबीसी प्रवर्गातंर्गत वैद्यकीय प्रवेशासाठी मराठा विद्यार्थ्यांना देण्यात आलेल्या १० टक्के आरक्षणाला आव्हान देण्यात आलेल्या याचिकांवर तत्काळ नवीन खंडपीठ स्थापन करून जलद निर्णय घेण्याचे निर्देश सुप्रीम कोर्टाने मुंबई उच्च न्यायालयाला दिले आहेत.या वर्षी जानेवारीमध्ये तत्कालीन मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश देवेंद्र कुमार उपाध्याय यांची दिल्ली उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश म्हणून बदली झाल्यानंतर याचिकांवर सुनावणी झाली नाही. पान २ वर

### निवडणुकीवर परिणाम?

याचिकाकर्त्यांचा युक्तिवाद १४ ऑक्टोबर २०२४ रोजी संपला होता. महाराष्ट्राच्या लोकसंख्येच्या जवळजवळ एक तृतीयांश लोकसंख्या असलेल्या मराठा समाजाला शिक्षण आणि सरकारी नोक-यांमध्ये १० टक्के आरक्षण देणारा २०२४ चा कायदा गेल्या वर्षी लोक

### जानेवारीनंतर सुनावणी नाही

या वर्षी जानेवारीमध्ये तत्कालीन मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश देवेंद्र कुमार उपाध्याय यांची दिल्ली उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश म्हणून बदली झाल्यानंतर याचिकांवर सुनावणी झाली नाही. न्यायमूर्ती उपाध्याय हे पूर्ण किंवा तीन न्यायाधीशांच्या खंडपीठाचा भाग होते जे गेल्या वर्षी एप्रिलपासून सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गीय कायदा, २०२४ विरुद्धच्या याचिकांवर सुनावणी करत होते.

### मुंबई उच्च न्यायालयाकडून विलंब

आगामी शैक्षणिक सत्रामुळे निर्माण झालेली निकड आणि मुंबई उच्च न्यायालयाकडून निर्णय घेण्यास होणारा विलंब याकडे याचिकाकर्त्यांनी सर्वोच्च न्यायालाचे लक्ष वेधले. वैद्यकीय प्रवेशासाठी उशीर होण्याची शक्यता सुनावणीवेळी अधोरेखीत करण्यात आली. सर्वोच्च न्यायालयाला योग्य ते निर्देश देण्याची विनंती करण्यात आली होती.

## तुंबलेल्या नाल्याचे पाणी रस्त्यावर!

समस्या:केजममध्ये नागरिकांना गैरसोय



पुण्यभूमी प्रतिनिधी

केज:हवामान विभागाने या पूर्वी सूचित केल्यानुसार काल बुधवारी दुपारच्या सुमारास अचानक सर्व दूर झालेल्या वादळी वाऱ्यासह मुसळधार पाऊसाने केज शहरासह तालुक्याला चांगलेच झोडपले. अनेक ठिकाणी झाडें उनमळून पडली. तर काही ठिकाणी विजेचे खांब उनमळून पडले. काल बुधवारी दुपार च्या सुमारास अचानक आलेल्या पावसामुळे शहरातील अनेक दिवसापासून तुंबलेल्या नाल्याचे पाणी रस्त्यावर साचले होते. नाल्यातील घाण पाणी रस्त्यावर साचल्यामुळे रस्त्यावर जिकडे तिकडे घाणच घाण पसरली होती. तर यामुळे उग्र वास येत होता. तर रस्त्यावर पाणीच पाणी साचले होते. शहरात अनेक दिवसापासून तुंबलेल्या नाल्याचे पाणी रस्त्यावर आल्यामुळे रस्त्यावर सगळीकडे घाण दिसत होती. या घाणी मुळे दूरगंदी सुटली होती. काल दुपारी अचानक आलेल्या वादळी वाऱ्यासह पान २ वर

## देशद्रोही विजय शहा

कर्नल सोफिया कुरेशी यांच्याबद्दल वादग्रस्त वक्तव्य करणारे मंत्री कुंवर विजय शहा यांच्याविरोधात गुन्हा दाखल करा, असे आदेश मध्य प्रदेश हायकोर्टाने दिले आहेत. मध्य प्रदेश हायकोर्टाने स्वत:हून कुरेशी यांच्यावर केलेल्या विधानाची दखल घेतली व मंत्री शहा यांच्या विरोधात लवकरात लवकर गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले. मध्य प्रदेश हायकोर्टाचे न्या. अतुल श्रीधरन यांच्या अध्यक्षतेखाली खंडपीठाने पोलिस महासंचालकांना बुधवारी सायंकाळपर्यंत मंत्र्याविरोधात गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले. तसेच असे कृत्य पुन्हा केल्यास त्यांना न्यायालयाच्या अवमान कारवाईचा सामना करावा लागेल, असे बजावले. या प्रकरणी सरकारी महाधिवक्त्यांनी वेळ मागितला असता न्यायालयाने राज्याचे महाधिवक्ता प्रशांत सिंह यांना निर्देश जारी केले व या प्रकरणी गुरुवारी सुनावणी करण्याचे निश्चित केले. मंत्र्यांच्या वकिलाने सांगितले की, न्यायालयाचा आदेश केवळ वर्तमानपत्रातील बातम्यांवर आधारित आहे.

त्यावर न्यायालय म्हणाले की, या प्रकरणी ते अधिकृत पुरावा म्हणून व्हीडीओ लिंकचा आधार घेतील. पहलगाम येथे पर्यटकांवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने आक्रमक भूमिका घेत 'ऑपरेशन सिंदूर' राबवले. 'ऑपरेशन सिंदूर'ची माहिती देण्याची जबाबदारी केंद्र सरकारने कर्नल सोफिया कुरेशी यांच्यावर सोपवली होती. त्यामुळे 'ऑपरेशन सिंदूर'चा भाग असलेल्या कर्नल सोफिया कुरेशी यांची देशभर प्रशंसा झाली, अजूनही होत आहे. मात्र, त्याच कर्नल सोफिया कुरेशी यांच्याबाबत आक्षेपार्ह विधान करून मध्य प्रदेशच्या भाजप सरकारमधील कॅबिनेट मंत्री कुंवर विजय शहा वादात सापडले आहेत. शहा यांचे हे वादग्रस्त विधान त्यांना चांगलेच भोवले आहे. मध्य प्रदेश उच्च न्यायालयाने शहा यांच्या या विधानाची दखल घेत त्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले. त्यानुसार रात्री ११.१५ वाजता त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला.इंदूर जिल्ह्यातील रायकुंडा गावात आयोजित हलमा कार्यक्रमात कॅबिनेट मंत्री विजय शहा म्हणाले, ज्यांनी आमच्या महिलांच्या कुंकावर घाला घातला, ज्यांनी आमच्या पर्यटकांना मारले, आम्ही त्यांच्याच बहिणीला त्यांच्याकडे पाठवले आणि त्यांना ठार मारले. दहशतवाद्यांनी आमच्या हिंदूंना कपडे काढून मारले आणि मोदींनी त्यांच्या बहिणीला आमच्या विमानातून त्यांच्या घरी पाठवून त्यांना वाईट वागणूक दिली आणि इशारा दिला की, जर तुम्ही आमच्या बहिणींना विधवा केले, तर तुमच्या समुदायाची बहीण येऊन तुम्हाला धडा शिकवेल. विजय शहा यांच्या या विधानाचा संबंध थेट लष्करी अधिकारी कर्नल सोफिया कुरेशी यांच्याशी आहे. शहा यांच्या याच वक्तव्याची दखल घेत उच्च न्यायालयाने त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले. त्यामुळे कर्नल सोफिया यांच्याबाबत वादग्रस्त वक्तव्य करणारे मध्य प्रदेशचे मंत्री विजय शहा यांच्या अडचणीत वाढ होणार हे निश्चित.न्या. अतुल श्रीधरन यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने मध्य प्रदेशच्या पोलिस महासंचालकांना हे आदेश दिले आहेत. याच मुद्यावरून राजकारण देखील पेटले आहे. मध्य प्रदेश काँग्रेसचे प्रमुख जितू पटवारी यांनी मंत्री विजय शहा यांच्या विरोधात तक्रार दाखल केली आहे. मध्य प्रदेशातील या मंत्र्याने लष्करातील अधिकारी आणि बहिणीचा अपमान केला आहे. त्यांना २४ तासांत पदावरून हटवले नाही तर आम्ही देशातील सगळ्या पोलिस ठाण्यांत विजय शहा यांच्याविरुद्ध तक्रार करू असे पटवारी म्हणाले. इंदूरच्या महिला काँग्रेस नगरसेवक यशस्वी पटेल यांनी विजय शहा यांचे तोंड काळे करणा-यास ५१ हजार रुपयांचे बक्षीस जाहीर केले आहे. देशाच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या प्रसंगात अशा पद्धतीचे राजकारण करणे मंत्र्यांना शोभत नाही. अशा मंत्र्यांचा राजीनामा घेतलाच पाहिजे असे त्या म्हणाल्या. कर्नल सोफिया कुरेशी यांच्याविरुद्धच्या वादग्रस्त वक्तव्याबद्दल सर्वोच्च न्यायालयाने मध्य प्रदेशचे मंत्री विजय शहा यांना चांगलेच फटकारले. 'जा आणि माफी मागा.थोडीशी संवेदनशीलता दाखवा' असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे. सरन्यायाधीश बी. आर. गवई यांनी मंत्र्यांकडून अशी विधाने अपेक्षित नसून, ती असंवेदनशील असल्याचे म्हटले आहे. संवैधानिक पदांवर असलेल्या व्यक्तींनी भाषण करताना संयम राखणे आवश्यक आहे. सरन्यायाधीश गवई यांनी शहा यांच्या वागणुकीवर प्रश्नचिन्ह उभे केले आणि म्हटले की, तुम्ही कोणत्या प्रकारची विधाने करत आहात? तुम्ही थोडी संवेदनशीलता दाखवली पाहिजे. उच्च न्यायालयात जाऊन माफी मागा. विरोधी पक्ष, लष्करी माजी सैनिक आणि सत्ताधारी भाजपच्याच अन्य सदस्यांकडून मोठ्या प्रमाणात टीका झाल्यानंतर मंत्री विजय शहा यांच्याविरुद्ध एफआयआर दाखल करण्यात आला. कर्नल सोफिया कुरेशी यांच्याबाबत वादग्रस्त विधान केल्यानंतर मंत्री विजय शहा यांनी माफी मागितली आहे. मी दहा वेळा माफी मागण्यास तयार आहे.माझ्याकडून चुकून अपशब्द निघाले असे ते म्हणाले. माझे संपूर्ण कुटुंब, कुळ लष्करी आहे. माझ्या कुटुंबातील अनेक लोक कारगिल आणि इतर ठिकाण शहीद झाले असेही शहा म्हणाले. भारतीय लष्कराने 'ऑपरेशन सिंदूर'द्वारा धडक कारवाई करून पाकिस्तानचे कंबरडे मोडले खरे परंतु प्रसिद्धीची हाव असणा-या व्यक्तींनी या संधीचा लाभ उठवण्याचा अश्लाघ्य, लाजीरवाणा प्रकार केला. तापलेल्या तव्यावर पोळी भाजून घेण्यासाठी संधिसाधू मागे राहतील कसे? काही चित्रपटनिर्मात्यांनी 'ऑपरेशन सिंदूर' या शीर्षकासाठी नोंदणी केली. वृत्तवाहिन्यांनी पाकिस्तानचे नामोनिशाण मिटवण्यासंबंधीच्या बातम्यांचा रतीब टाकला. भाजपने याच मोहिमेला केंद्रित करून दहा दिवसांची तिरंगा यात्रा सुरू केली. शस्त्रसंधी नको असलेल्यांनी परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री यांना व त्यांच्या कुटुंबियांना अर्वाच्च भाषेत ट्रोल केले, धमक्या दिल्या. मंत्री विजय शहा यांनी कर्नल सोफिया कुरेशी यांच्यावर निशाणा साधला. प्रसिद्धीलोलुप व्यक्तींच्या या निर्लज्जपणाला काय म्हणाल?

# धाराशिवमध्ये कुस्त्यांचा महोत्सव!

## क्रीडा:विजेत्यांना परितोषिकांचे वितरण




पुण्यभूमी प्रतिनिधी

कळंब:युवक आघाडी शिवजयंती उत्सव समिती कळंब,जिल्हा धाराशिव २०२५ व महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन व धाराशिव जिल्हा कबड्डी असोसिएशन यांच्या मान्यतेने राज्यस्तरीय खुला गट पुरुषांची निमंत्रित कबड्डी स्पर्धा दिनांक १०, ११ व १२ मे २०२५ रोजी छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुल बार्शी रोड, कळंब येथे संपन्न झाली या स्पर्धेत प्रथम बक्षीसाचा मानकरी जयहिंद स्पोर्ट क्लब श्रीरामपूर संघास पहिले बक्षीस ५१ हजार रुपये कै. सुरेश हारकर यांच्या स्मरणार्थ फिरता चषक, मा. उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे महाराष्ट्र राज्य यांच्या ६१ निमित्त मा. अजित (दादा) पिंगळे यांच्या सौजन्याने तर द्वितीय क्रमांकाचा मानकरी म्हणून आझाद क्रीडा मंडळ आहिल्यानगर संघास रोख दुसरे बक्षीस ३१ हजार रुपये कै. तुकाराम ( दादा ) कदम यांच्या प्रित्यर्थ चषक ,मा. डॉ. संदीप तांबारे व सुरेश आळणे यांच्या सौजन्याने २१ हजार रुपये व १० हजार रुपये बक्षीस तर तृतीय स्वराज्य क्रीडा मंडळ भूम या संघास कै. दिलीप जावळे यांच्या प्रित्यर्थ चषक, शशिकांत निरपळ यांच्या सौजन्याने २१,००० रुपये रोख बक्षीस देण्यात आले याचबरोबर उत्कृष्ट पकड संदेश देशमुख,शारदा क्रीडा मंडळ गेवराई रोख बक्षीस २५०१ हरिश्चंद्र चोंदे यांच्या स्मरणार्थ उत्कृष्ट चढाई आदित्य गडाख आझाद क्रीडा मंडळ आहील्यानगर २५०१ विलास थोरात यांच्या स्मरणार्थ, अष्टपैलू खेळाडू म्हणून निलेश वरे स्वराज्य क्रीडा मंडळ भूम ५००१ संपतराव गायकवाड यांच्या स्मरणार्थ दिवसाचा सामनावीर युवराज गवारे, जय हिंद स्पोर्ट क्लब श्रीरामपूर २५०१ कै. बशीर ( दौला ) मणियार यांच्या स्मरणार्थ रोख बक्षीस व वरील सर्व वैयक्तिक बक्षीस माननीय पांडुरंग कुंभार यांच्या सौजन्याने देण्यात आली आहेत तसेच याप्रसंगी उत्कृष्ट खेळाडू म्हणून अभी पवार अहिल्यानगर ,महारुद्र गर्जे,महासांगवि पाटोदा यांचा सत्कार करण्यात आला मॅटवर खेळविल्या गेलेल्या या स्पर्धेत राज्यातून १५ संघाने सहभाग घेतला, स्पर्धेचे बक्षीस वितरण स्पर्धेचे संयोजक - युवक आघाडी अध्यक्ष यशवंत दशरथ, काँग्रेस (आय ) पक्षाचे तालुकाध्यक्ष पांडुरंग (तात्या ) कुंभार, धाराशिव जिल्हा कबड्डी असोसिएशनचे जिल्हाध्यक्ष लक्ष्मण तात्या मोहिते, फ्रेंड्स फोरेव्हर ग्रुपचे डॉ अभिजीत लोंढे,क्रीडा प्रशिक्षक सुबराव कांबळे, प्रा.साजेद चाऊस, फुलचंद कदम , महाराष्ट्र कबड्डी असोसिएशनचे माजी प्रदेश उपाध्यक्ष महादेव साठे यांच्या हस्ते खेळाडूंना ट्रॉफी,स्मृती चिन्ह,पुष्पगुच्छ व रोख बक्षीस देण्यात आले प्रसंगी खेळाडूंचे स्वागत फ्रेंड्स फोरेव्हर ग्रुपचे राहुल कवडे, दिनेशअष्टेकर,उदय खंडागळे, परमेश्वर मोरे, युवक आघाडी व क्रीडा मंडळाच्या वतीने गजानन चोंदे, रवी उबाळे,जगदीश गोरे,अनिल कुलकर्णी, माधवसिंग राजपूत , रत्नदीप उबाळे, विश्वजीत वेदपाठक यांनी केले या स्पर्धेसाठी पंच म्हणून मोहन पाटील, निखिल हुंबे, दत्तात्रेय जावळे , (धाराशिव ) संग्राम मोहिते, रमेश मोहिते, अनिल शिंदे, राजाभाऊ शिंदे, रमेश माळी, संतोष चव्हाण, लालबा कावळे यांनी काम पाहिले स्पर्धा यशस्वी करण्यासाठी ऋषिकेश दशरथ,पवन वेदपाठक,अतुल पाटील, प्रसन्न हुलसुलकर यांनी परिश्रम घेतले.

## ओम साई पबचत गटाचा उपक्रम



पुण्यभूमी प्रतिनिधी

कळंब:तालुक्यातील खामसवाडी येथील ओम साई पुरुष बचत गट यांच्यावतीने गटातील सदस्याच्या घरी मुलीच्या लग्न कार्यासाठी दहा हजार रुपये व गटाच्या बाहेरील कर्जदारांसाठी दोन हजार रुपये आहेर म्हणून गेल्या अनेक वर्षापासून आर्थिक सहकार्य करण्याची परंपरा चालू ठेवली आहे राजेंद्र शिवाजी गरड यांच्या मुलीचे लग्न दिनांक १६ मे २०२५ रोजी असल्याने व महादेव गणपती कोष्टी यांची पुतणीचे लग्न २३ मे २०२५ रोजी असल्याने राजेंद्र गरड व महादेव कोष्टी यांना प्रत्येकी दहा हजार रुपये चा धनादेश गावातील ग्रामपंचायत सदस्य विश्वास कोकणे,पत्रकार सुशील लालासाहेब पाटील युवा नेते शशिकांत बाबासाहेब पाटील व दिव्य मराठीचे पत्रकार गोपाळ हरिश्चंद्र शेळके गट चालक शंकर हिरे,नाना महाजन यांच्या हस्ते देण्यात आला.

## अशोक विद्यालय चिंचाळा शाळेचा दहावी परीक्षेचा निकाल ९४.००%

वडवणी। प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील चिंचाळा येथील,अहिल्यादेवी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित,अशोक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाने फेब्रुवारी,मार्च २०२५ मध्ये घेतलेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र इयत्ता दहावी परीक्षेच्या निकाल ९४.०० लागला असून प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी उज्वल यशाच्या निकालाची परंपरा शाळेने कायम ठेवली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे यांनी फेब्रुवारी,मार्च-२०२५ मध्ये घेतलेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र इयत्ता दहावीच्या परीक्षेचा निकाल मंगळवार दि. १३ मे २०२५ रोजी मंडळाचे अधिकृत संकेतस्थळावर जाहीर करण्यात आला असून वडवणी तालुक्यातील चिंचाळा येथील,अशोक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा ९४.०० निकाल लागला असून विद्यालयामधून कु.गायकवाड धनश्री सचिन ९१.२० गुण घेऊन प्रथम क्रमांक आला आहे तर कु.मुंडे पायल लक्ष्मण ९०.०० % गुण घेऊन व्दितीय क्रमांक पटकावला व कु.आजबे वेदिका जगन्नाथ ८८.२० % गुण घेऊन तृतीय क्रमांक आला आहे तसेच विद्यालयाचे ४० विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले आहेत. सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे संस्थापक, अध्यक्ष मा.श्री.सर्जेरावजी काळे सर व युवा नेतृत्व मा.ड.आनंद भैय्या काळे तसेच प्राचार्य तथा मुख्याध्यापक श्री. सावंत बी.आर.,उपप्राचार्य पटाईत सर,श्री.आवारे सर,श्री.सुशांत काळे सर, श्री.खळगे सर,श्री.डोंगरे सर, श्री.चोरमले सर,श्री.कोळपे सर,श्रीमती सावंत मॅडम,श्रीमती महानोर मॅडम, श्रीमती पांचाळ मॅडम,श्रीमती बोत्रे मॅडम यांच्यासह विद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेत्तर व प्राध्यापक यांनी कौतुक करून अभिनंदन केले व पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## पान एक वरून

**डोनाल्ड ट्रम्प फडणवीसांच**

डोनाल्ड ट्रम्प यांचा पुतळा बसवा आणि वरती अमेरिकेचा झेंडा लावा, अशी टीका खासदार संजय राऊत यांनी केली. यावेळी खासदार संजय राऊत यांनी मध्य प्रदेशचे मंत्री विजय शाह यांच्यावर टीका केली. त्यांना अटक करण्याची मागणी केली. ऑपरेशन सिंदूर दरम्यान मीडिया ब्रीफिंगमध्ये सहभागी असलेल्या कर्नल सोफिया कुरेशी यांच्यावर शाह यांनी आक्षेपार्ह टिप्पणी केली होती. दरम्यान, मध्य प्रदेश उच्च न्यायालयाने भाजप मंत्री कुंवर विजय शाह यांच्याविरुद्ध स्वत:हून एफआयआर नोंदवण्याचे निर्देश दिले आहेत. यावर बोलताना राऊत म्हणाले, भारतीय जनता पक्षाच्या नेत्याने अशा प्रकारची देशद्रोही विधान केली. त्यांनी अनेक प्रकारची अशी विधान केली आहेत. हिंदू-मुसलमानांमध्ये भांडण लावणे. सोफिया कुरेशी यांना पाकिस्तान किंवा आतंकवादी म्हणणं, हा देशद्रोह आहे, त्यांना अटक केली पाहिजे, अशी मागणी केली.

**...क्लासेसचा किती हप्ता**

काय असा प्रश्न नागरिकांना पडला आहे व शासनाचे शैक्षणिक संमधीत अधिकारी सुध्दा कोचिंग क्लासेस चालवणाऱ्यां भुरट्या शिक्षकांना सहमत आहेत की काय व हप्ता घेऊन गप्प गार आहेत असे नागरिकांना प्रश्न पडला आहे. कोचिंग क्लासेस ची साधी तपासणी सुद्धा नाही केजीपासून कॉलेजपर्यंत कोचिंग क्लासेसच्या रूपाने एक पर्यायी शिक्षण व्यवस्था केज शहरात चालू आहे. व त्यांच बळावर शैक्षणिक संमधीत अधिकारी पोळीभाजत की काय व क्लासेस वाल्यांच्या जिवावर संमधीत अधिकाऱ्यांना सुध्दा दुप्पट पगाराची लालुच लागली आहे की असा प्रश्न नागरिकांना पडला कारण आजपर्यंत केज तालुक्यातील एकाही खाजगी कोचिंग क्लासेस चालवणाऱ्यां क्लासेसची साधी चौकशी सुध्दा शिक्षण संमधीत अधिकाऱ्यांनी चौकशी केली नाही यांचे कारण खाजगी कोचिंग क्लासेस चालवणाऱ्यांनी संमदीत अधिकाऱ्यांना हप्ता भेटतो की काय असा प्रश्न नागरिकांना पडला आहे. श त्यामुळे प्रायव्हेट कोचिंग क्लासेस सोबत शिक्षण संमधीत अधिकारी सुध्दा शिक्षण व्यवस्थेला लागलेला एक शाप आहे. त्यामुळे केज तालुक्यातील खाजगी कोचिंग क्लासेस बंद कधी होणार असा प्रश्न नागरिकांना पडला आहे व संमधीत प्रशासनाने झोपेचे सोंग घेतले आहे व खाजगी कोचिंग क्लासेसन शिक्षणाचा बाजार मांडला आहे व शिक्षण संमधीत अधिकारी कुठल्याही प्रकारची दखल घेत नाहीत त्यामुळे शिक्षण संमधीत अधिकारी हप्ता घेऊन गप्प बसले आहेत की काय असा प्रश्न नागरिकांनी व्यक्त केला आहे.

**भारताने दिला तुर्कीला**

नोव्हेंबर २०२२ रोजी ग्राऊंड हँडलिंग एजन्सीच्या रुपात ही मंजुरी देण्यात आली होती. ही मंजुरी आता रद्द करण्यात आली आहे. नागरी उड्डाण मंत्रालयातील सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार ज्या विमानतळांवर सेलेबीकडून सेवा दिल्या जात आहेत, तिथे पर्यायी ग्राऊंड हँडलिंग एजन्सींसोबत समन्वय ठेवून अंतरिम व्यवस्था केल्या जातील. लवकरच नव्या सेवा पुरवठादाराच्या नियुक्तीसाठी निविदा काढल्या जातील, असे सांगण्यात आले. सेलेबी एव्हिएशनला देण्यात आलेली परवानगी रद्द करण्याची मागणी शिवसेनेचे आमदार मुरजी पटेल यांनी मुख्य विमानतळ अधिका-यांकडे केली होती. याची दखल घेण्यात आली आहे.

**सेलेबी कंपनीची ९ विमानतळावर सेवा :** सेलेबी एव्हिएशन देशातील ९ मोठ्या विमानतळांवर सेवा देते. यामध्ये दिल्ली, मुंबई, चेन्नई यांच्यासारख्या संवेदनशील विमानतळांचा समावेश आहे. ग्राऊंड हँडलिंग, कार्गो सेवा आणि एअरसाईड ऑपरेशनसारख्या सुरक्षेशी संबंधित कामांची जबाबदारी सेलेबी एव्हिएशनकडे आहे. परंतु आता सुरक्षा मंजुरी रद्द करण्यात आल्याने या कंपनीला गाळा गुंडाळावा लागणार आहे.

**मतदार संघाला सोडले**

लोखंडेनी जनता वाऱ्यावर सोडून देऊन मौज मजा करण्यात व्यस्त झाल्या आहे निधीच्या कामाचे उद्घाटन आमदार सासरे नंदकिशोर मुंदडाच करतात मग आमदारा नमीता लोखंडे काय लग्न, सप्ताह, वास्तुशांती ,सात्वन पर भेट,जयंती उत्सव,यांच्या साठी आमदार झाल्या आहेत का तसेच कुठल्याही कार्यक्रमाचे विविध गाण्यावर विडीओ पोस्ट करणे म्हणजे जनु काय एखाद्या साधु संतच आहेत अशा अभंगावर विडीओ पोस्ट करणे म्हणजे आमदार नमीता लोखंडे फक्त नावाला आमदार आहेत का असा प्रश्न नागकांना पडला चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरु झाले आहे.

**मराठा आरक्षणासाठी नवे**

त्याविरोधात याचिकाकर्ते सुप्रीम कोर्टात पोहचले. सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी मुंबई उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांना मराठा आरक्षण देणा-या कायद्याच्या घटनात्मक वैधतेला आव्हान देणा-या याचिकांवर जलद सुनावणी करण्यासाठी नवीन खंडपीठ स्थापन करण्याचे निर्देश दिले.

**तुंबलेल्या नाल्याचे पाणी**

मुसळधार पाऊसाने केज शहर आणि तालुक्यात वादळी वाऱ्यांसह काही भागात गारपिटीचा जोरदार पाऊस झाला. यावेळी केज शहरात सुमारे अर्धा पाऊण तास पडलेल्या पावसामुळे नदी नाल्या ओसंडून वाहून रस्त्यांवर पाणी साचले. अचानक झालेल्या या हवामान बदलामुळे शहरवासीयांची चांगलीच धांदल उडाली. नागरिक दुकाने, टपऱ्या आणि इतर आडोशांखाली धाव घेताना दिसले. नेहमी प्रमाणेच पाऊस सुरू झाला की शहरातील बहुतांशी भागात वीजपुरवठाही खंडित झाला आहे. गारपिटीमुळे परिसरातील शेतीसही फटका बसण्याची शक्यता आहे. आंबे, व फळ बागा देखील मोठा फटका बसण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकरी वर्गात चिंता व्यक्त होत असून प्रशासनाने तातडीने नुकसानीचे पंचनामे करून मदती करण्याची मागणी होत आहे.

## पान सहा वरून

**पाटोद्यात संभाजी राजांना**

अनुकरण करावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.शहरातील विविध चौकांत महाराजांची प्रतिमा सजवून फुलांनी व विद्युत रोषणाईने सजवण्यात आली होती.काही ठिकाणी सांस्कृतिक कार्यक्रम देखील पार पडले. ही जयंती केवळ एक उत्सव न राहता, नव्या पिढीसाठी प्रेरणादायी ठरावी यासाठी आयोजकांनी विशेष मेहनत घेतली. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली. संपूर्ण पाटोदा शहरात दिवसभर राष्ट्रभक्तीचे वातावरण पाहायला मिळाले

**गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार**

अधिकारी श्रेणी एक या पदावर नुकतीच निवड झालेले नारायण राजेभाऊ इंगळे यांचाही शाल, पुष्पहार मनोज दादा जरांगे पाटील यांची प्रतिमा व पुष्पगुच्छ देऊन मान्यवरांच्या हस्ते यथोचित सत्कार करण्यात आला .याप्रसंगी गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते .या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रकाश काळे यांनी केले तर आभार प्रदर्शन उपसरपंच बालासाहेब तपसे यांनी केले.

**कळंबमध्ये रुग्णांना मिळाला**

खरे पुण्य आहे असे सांगून डॉ.कोठावळे यांचे अभिनंदन केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन आशोक बिक्कड यांनी केले तर मुख्याध्यापक राजेंद्र बिक्कड यांनी प्रस्ताविक केले आणि डॉ. रमेश जाधवर यांनी उपस्थितांचे आभार मानले या समारंभाला वैद्यकीय,सामाजिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवर,मित्रपरिवार व आप्तेष्ट मोठ्या संख्येने उपस्थित होते कोठावळे हॉस्पिटल मुळे कळंब शहरात एक सक्षम व आधुनिक आरोग्यसेवा उपलब्ध होणार असल्याचे समाधानकारक भावना नागरिकांतून व्यक्त होत आहे.

**लिट्ल फ्लॉवर इंग्लिश**

सावंत सर, अर्जुन सानप सर, उज्वला भोसले मॅडम, शाहिद सर आणि सुजित घोलप सर यांनी विद्यार्थ्यांचे व पालकांचे मनःपूर्वक अभिनंदन करत त्यांच्या उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. या यशामुळे लिट्ल फ्लॉवर इंग्लिश स्कूल, पाटोदा ने तालुक्यातील शैक्षणिक क्षेत्रात आपली एक विशिष्ट आणि आदर्श ओळख निर्माण केली आहे.


**इंजिनिअर तुपाशी,लाभार्थी**

ला माहीत नाही तर आवघड आहे जर हे कंत्राटी इंजिनिअर घरकुला साठी दहा दहा पंधरा पंधरा हजार मागतात सर्व सामान्य लोकांनी करायचं काय जर पैसे नाही दिले की घरकुलाचे हप्तेआडवा अडवी करायचे पैसे दिल्याशिवाय सही करायची नाही अडथळा निर्माण करण्याचे काम केज पंचायत समितीच्या घरकुल विभागाला असलेले कंत्राटी इंजिनिअर करतात त्यात त्या कांदे मॅडमने तर हदच पार केली आहे सगळ्या इंजिनिअर मध्ये कांदे पैसे खाण्यात सगळ्यात पुढे आहे केज पंचायत समितीतीलकेज पंचायत समितीतील अधिकारी यांना दिसत नाही का इंजिनिअर आहे माझं कोणीच काही करू शकत नाही अशी भाषा वापरतात बिडीओ दिवाणे मॅडम तुम्ही फक्त घरकुल लाभार्थी यादी आणि इंजिनिअरचे फोन पे व गुगलपे चक्क करा सगळेच समोर येईल व सर्व सामान्य लोकांचे हाल थांबतील नाहीत बिडीओने या कडे लक्ष देऊन योग्य ती काय्रार्न करणे गरजेचे आहे.

**अमृता लखापतींनी घेतला**

करून घेतले. कु. अमृता लखापती यांचे परळी उपविभागात आगमन झाल्यावर कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी त्यांचे स्वागत केले. कनिष्ठ अभियंता रूपाली घोडगे, सहाय्यक लेखापाल संतोष आलापुरे ,धनराज ठोंबरे निम्नस्तर लिपिक आणि निम लिपिक वीरेंद्र शिंपी यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे अभिनंदन केले.यावेळी प्रभारी उपकार्यकारी अभियंता अभिजीत राठोड यांनी कुमारी लखापती यांना शुभेच्छा दिल्या आणि त्यांच्या पुढील वाटचालीस मार्गदर्शन केले. कार्यालयातील इतर कर्मचाऱ्यांनीही त्यांच्यासोबत संवाद साधला आणि त्यांना सहकार्याचे आश्वासन दिले.कु.अमृता लखापती यांच्या नियुक्तीमुळे त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी-०२४४२-२९९०८४,ई-मेल-beedpunyabhumi@gmail.com
Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com



## छत्रपती संभाजी महाराजांना महापालिकेतर्फे अभिवादन !

**कल्याण :** छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंती दिनानिमित्त आज महापालिकेतर्फे त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. महापालिका मुख्यालयात माहिती व जनसंपर्क विभागाचे उपआयुक्त संजय जाधव यांनी छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी उपस्थित महापालिका सचिव किशोर शेळके, सुरक्षा अधिकारी भरत बुळे, सहा. सुरक्षा अधिकारी सुरेश पवार तसेच इतर कर्मचारी वर्ग यांनी देखील छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पसुमने अर्पण करून अभिवादन केले.

### वेचक

## कचरावेचक कुटुंबातील यशस्वी विद्यार्थी

**कल्याण :** कल्याणच्या डम्पिंग ग्राऊंडवर काम करणाऱ्या कचरावेचक कुटुंबातील ५ विद्यार्थ्यांनी दहावीच्या परीक्षेत घवघवीत यश मिळवत मुख्य प्रवाहाच्या दिशेने मोठी झेप घेतली आहे. गौरी सोनवणे ६३, श्रद्धा सोनवणे ६५, अर्चना घुले ५१, कुणाल उकांडे ६०, दीपक जगताप



४६ टक्के अशी या पाच विद्यार्थ्यांची नावे आहेत. या मुलांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी गेल्या एक दशकांहून अधिक काळ मेहनत घेणाऱ्या अनुबंध संस्थेशी हे विद्यार्थी जोडले गेले आहेत. या पाचही जणांचे करावे तितके कौतुक कमीच ठरेल. या पाचही जणांच्या जिद्दीला आणि त्यांच्या मनामध्ये ही जिद्द निर्माण करणाऱ्या अनुबंध संस्थेला कार्य कौतुकास्पद आहे.

## अटाळी विद्यालयाचा १०० टक्के निकाल

**कल्याण :** अटाळीतील मातोश्री शेवंताबाई गजानन पाटील माध्यमिक विद्यालयाचा यंदाही १०० टक्के एसएससी निकाल लागला असल्याने गेल्या नऊ वर्षांपासून १०० टक्के एसएससी निकालाची परंपरा कायम ठेवली आहे. संकेत भांगरे ९१.२०% , श्रावणी मांडवे ९०.४०%,वेदांत



पवार ९०.२०% मिळवित अनुक्रमे प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाले आहेत, तर शाळेच्या इंग्रजी माध्यमाचे विद्यार्थी नुपूर पाटील ९०.२०टक्के, मयूर सोनवलकर ८९.००टक्के, साहिश कांबळे ८८.०० टक्के गुण मिळाले असून अनुक्रमे प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाले. इंग्रजी, मराठी माध्यमाचे सन २०२४-२५ एसएससी शालांत परीक्षेला बसलेले शाळेचे सर्वच विद्यार्थी उत्तीर्ण झाल्याने यंदाही शाळेने १०० टक्के निकालाची परंपरा कायम ठेवली असल्याचे शाळेचे मुख्याध्यापक गणेश पाटील यांनी माहिती दिली.

## सचिन पवार विश्वकर्मा पुरस्काराने सन्मानित




**ठाणे :** एसटी महामंडळाच्या ठाणे आगार क्रमांक १ येथे वाहतूक नियंत्रक या पदावर कार्यरत असलेल्या सचिन मारुती पवार यांना कामगार क्षेत्रातील मानाचा विश्वकर्मा गुणवंत कामगार पुरस्कार राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या वतीने मुंबई येथे पुरस्कार वितरण सोहळा नुकताच आयोजित करण्यात आला होता. समाजातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम केलेल्या कर्मचाऱ्यांसाठी हा मानाचा पुरस्कार समजला जातो. सचिन पवार हे रत्नागिरी जिल्ह्यातील उमराठ या गावचे सुपुत्र आहेत. क्षत्रिय धारपवार या त्यांच्या समाज बांधवांसाठी असलेल्या चॅरिटेबल संस्थेचे ते उपाध्यक्ष आहेत. एसटीत वाहक पदापासून सुरुवात करणारे सचिन पवार आज वाहतूक नियंत्रक पदापर्यंत पोहोचले आहेत या प्रवासात त्यांनी नेहमी एसटी उत्पन्न वाढीसाठी सातत्याने प्रयत्न केलेले आहेत .सचिन पवार यांचे ठाणे विभागातील एसटी कर्मचारी व अधिकाऱ्यांनी, समाज बांधवांनी अभिनंदन केले आहे.

## एफ-टॅम तेलुगू समुदायाकडून आंतरराष्ट्रीय मातृदिन साजरा

**ठाणे :** आंतरराष्ट्रीय मातृदिनानिमित्त एफ-टॅम ठाणे तेलुगू समुदायाने ठाणे कार्यालयात तेलुगू असोसिएशन ऑफ महाराष्ट्रचे अध्यक्ष गंजी जगनबाबू आणि जनरल सेक्रेटरी कांते अशोक यांच्या नेतृत्वाखाली आंतरराष्ट्रीय मातृदिन साजरा करण्यात आला. हैदराबाद येथील प्रसिद्ध पुरस्कार विजेते लेखिका, कवी डॉ. बंडारू सुजाता शेखर गरू यांनी प्रमुख पाहुणे म्हणून या कार्यक्रमाची शोभा वाढवली आणि त्यांनी जीवनात आईच्या महत्त्वावर त्यांच्या साहित्यिक कविता आणि लेख सादर केले. यावेळी राघव राव, अंजी रेड्डी, चंदू सुर्पानेनी, एनआरजी राव, नेमलुरी संध्या, गांडुरी श्रीनिवास, राहुल कोळी यांनी कार्यक्रमाला उपस्थिती लावली आणि त्यांच्या आयुष्यात त्यांच्या आईच्या योगदानाचे स्मरण केले.



# मान्सून कालावधीत लोकप्रतिनिधींशी समन्वय साधून काम करावे

### महापालिका आयुक्त सौरभ राव यांचे बैठकीत उपायुक्तांना निर्देश

**◆ ठाणे ( प्रतिनिधी) :**

ठाणे महापालिका कार्यक्षेत्रात मान्सूनपूर्व कामे जलदगतीने सुरू असून सर्व कामे ३१ मे पूर्वी पूर्ण होण्याच्यादृष्टीने महापालिकेने नियोजन केले आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिलेल्या सूचनांनुसार सर्व कामांवर प्रशासनाचे बारीक लक्ष आहे असे नमूद करीत पावसाळ्यामध्ये आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास त्याचा सामना करण्यासाठी महापालिका यंत्रणा संपूर्णपणे सज्ज असल्याचे आयुक्त सौरभ राव यांनी झालेल्या बैठकीत नमूद केले. तसेच सद्यस्थितीत जी कामे सुरू आहेत त्याबाबत लोकप्रतिनिधींच्या सूचना घेऊन तशा पद्धतीने कामे करावीत तसेच मान्सून कालावधीत लोकप्रतिनिधींशी समन्वय साधून असेही निर्देश त्यांनी सर्व उपायुक्त व सहायक आयुक्त यांना दिले. खासदार नरेश म्हस्के यांनी मान्सूनपूर्व कामांचा आढावा घेण्यासाठी माजी नगरसेवक व महापालिका प्रशासन यांच्यासमवेत महापालिकेतील नरेंद्र बल्लाळ सभागृहात बैठक आयोजित केली होती. या बैठकीत आयुक्त सौरभ राव, अतिरिक्त आयुक्त संदीप



माळवी, नगरअभियंता प्रशांत सोनग्रा, उपायुक्त जी.जी. गोदेपुरे, मनिष जोशी, शंकर पाटोळे यांच्यासह सर्व प्रभागसमितीचे सहाय्यक आयुक्त व महापालिकेतील माजी नगरसेवक उपस्थित होते.

सर्व प्रभागसमितीनिहाय नालेसफाईचे काम युद्धपातळीवर सुरू आहे; परंतु मध्यंतरी झालेल्या पावसामुळे डोंगराहून वाहून आलेला गाळ नाल्यात आल्याने पुन्हा नालेसफाई केली जाणार असल्याचे आयुक्तांनी यावेळी नमूद केले. स्थानिक लोकप्रतिनिधींना विश्वासात घेवून काम करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. नालेसफाईबरोबरच अंतर्गत गटारे, रस्त्याच्या दुतर्फा असलेली गटारे देखील साफ केली जातील. तसेच पावसाळ्यात रस्त्यावर कोणत्याही प्रकारे खड्डे पडणार नाही याबाबतची दक्षता घेतली असून जर खड्डा पडला तर तो तात्काळ अत्याधुनिक पद्धतीने बुजविला जाईल असेही त्यांनी सांगितले.

सदर बैठकीत वृक्ष छाटणीबाबतही लोकप्रतिनिधींनी चर्चा केली असता, ती देखील ३० मे पूर्वी पूर्ण केली जातील असे आयुक्तांनी नमूद केले. तसेच वृक्ष छाटणीनंतर जमा झालेल्या हरित कचऱ्याची तातडीने विल्हेवाट लावण्याच्या सूचना यावेळी संबंधित विभागाला दिल्या. महापालिका कार्यक्षेत्रात एमएमआरडीए, एमएमआरडीसी, मेट्रो प्राधिकरण, सार्वजनिक बांधकाम विभाग आदी प्राधिकरणांच्या अखत्यारितील देखील कामे सुरू आहेत. सदर कामे ३० मे पूर्वी पूर्ण करण्याच्या सूचना देखील त्यांना देण्यात आलेल्या आहे.

परंतु पावसाळ्यात संबंधित प्राधिकरणाच्या अखत्यारित येणाऱ्या कोणत्याही रस्त्यावर खड्डा पडल्यास ते काम नागरिकांच्या सोईसाठी महापालिका करेल असेही आयुक्त सौरभ राव यांनी नमूद केले. पावसाळ्यापूर्वी खासदार नरेश म्हस्के यांच्या पुढाकाराने आयुक्त सौरभ राव यांनी बैठक आयोजित करुन विविध विभागातील समस्या जाणून घेतल्या याबाबत लोकप्रतिनिधींनी आयुक्तांचे आभार व्यक्त केले.

### अधिकाऱ्यांना आयुक्तांनी दिल्या सक्त सूचना

पावसाळ्यामध्ये आपत्कालीन परिस्थितीमध्ये सर्व विभागांनी संगनमताने काम करावयाचे आहे, कोणत्याही विभागाची तक्रार प्राप्त झाल्यास ती जबाबदारी एकमेकांवर न ढकलता नागरिकांच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना तातडीने करण्याचे निर्देश आयुक्त सौरभ राव यांनी सर्व अधिकाऱ्यांना दिले.

### मुलांच्या क्रीडा हक्कासाठी पालिकेकडे निवेदन

## सानपाडा स्वामी विवेकानंद संकुल शालेय मैदानाची दुरवस्था

**◆ नवी मुंबई (वार्ताहर) :**

सानपाडा विभागातील स्वामी विवेकानंद संकुल अंतर्गत येणाऱ्या शासकीय शालेय मैदानाची अवस्था दिवसेंदिवस अत्यंत गंभीर होत चालली आहे. हे मैदान शाळेतील विद्यार्थ्यांसह परिसरातील खेळाडू, महिला व ज्येष्ठ नागरिकांसाठी एकमेव खुलं मैदान असून, त्याच्या दुरवस्थेमुळे हजारो नागरिकांना अडचणींना सामोरे जावे लागत आहे. या पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्ते निलेश सोमाजी कचरे यांनी नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त, शिक्षण विभाग, उद्यान विभाग, क्रीडा विभाग, स्थापत्य विभाग, आणि मालमत्ता विभाग यांना संबोधित करत विस्तृत निवेदन सादर केले. या निवेदनात मैदानाच्या दुरवस्थेचे ठळक मुद्दे आणि त्यावर तातडीने उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली आहे.

मैदानात मोठ्या प्रमाणावर डेब्रिज (मलबा) व अस्वच्छता आढळते. रात्रीच्या वेळेस मद्यप्राशन व अन्य अनैतिक कृत्यांची शक्यता. मैदानातील झाडांची देखभाल होत नसणे, सुरक्षा व्यवस्था पूर्णपणे गैरहजर. शालेय वेळेव्यतिरिक्त मैदान नागरिकांसाठी खुले नसणे. पिण्याचे पाणी, शौचालय, व जॉगिंग ट्रॅकसारख्या मूलभूत सुविधा अनुपलब्ध. मनपाच्या मालमत्ता नोंदीत या मैदानाची स्थिती स्पष्ट नसल्याचे निदर्शनास आले.



### नागरिकांची भावना :

परिसरातील अनेक पालक, खेळाडू, महिला मंडळे व स्थानिक नागरिकांनी देखील कचरे यांच्या या उपक्रमाचे स्वागत करत प्रशासनाकडे तातडीने कृती करण्याची मागणी केली आहे. जर वेळेत उपाययोजना केल्या नाहीत, तर हे मैदान अनधिकृत व असामाजिक घटकांच्या ताब्यात जाण्याचा धोका निर्माण झाला आहे.

## छत्रपती संभाजी महाराजांना अभिवादन



**भिवंडी :** शासन परिपत्रक व भिवंडी महानगरपालिका प्रशासक तथा आयुक्त अनमोल सागर (भा.प्र.से) यांच्या निर्देशानुसारछत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त महानगरपालिका मुख्यालयातील तळमजल्यावर भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या वतीने अति-आयुक्त देविदास पवार यांच्या शुभहस्ते छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्याचा कार्यक्रम संपन्न झाला. या प्रसंगी उपायुक्त विक्रम दराडे, उप-आयुक्त (कर) बाळकृष्ण क्षिरसागर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी रामप्रसाद सोलुंके, सहा. आयुक्त नितिन पाटील, विभाग प्रमुख मिलींद पळसुले, प्रशंत संखे,अनिल आव्हाड, स्नेहल पुण्यार्थी व इतर कर्मचारी या प्रसंगी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## लोक अदालतीतून वीज ग्राहकांची १ हजार १४९ प्रकरणे निकाली

**◆ कल्याण (प्रतिनिधी):**

तालुका न्यायालय स्तरावर १० मे रोजी आयोजित लोक अदालतीत या ग्राहकांनी सहभाग नोंदवून ३ कोटी ३९ लाखांचा भरणा करून आपापली प्रकरणे सामोपचाराने मिटवली. कल्याण मंडल एक अंतर्गत डोंबिवली, कल्याण पश्चिम व पूर्व विभागात १९६ ग्राहकांनी ७८ लाख ३६ हजार रुपयांचा भरणा करून आपल्या प्रकरणांचा निपटारा केला. तर कल्याण मंडल दोन अंतर्गत उल्हासनगर, अंबरनाथ, बदलापूर, टिटवाळा, शहापूर, मुरबाड भागातील १ कोटी ८४ लाख रुपयांचा भरणा करणाऱ्या ४२७ ग्राहकांची प्रकरणे सामोपचाराने मिटवण्यात आली.

वसई मंडलांतर्गत वसई, विरार, वाडा, सफाळे येथील ४६० ग्राहकांनी लोक अदालतीत सहभागी होत ७३ लाख ३७ हजार रुपयांचा भरणा केला, तर पालघर मंडल कार्यालयांतर्गत पालघर, बोईसर, डहाणू, तलासरी, विक्रमगड, जव्हार, मोखाडा येथील ६६ ग्राहकांनी ३ लाख ३३ हजार रुपये भरून आपली प्रकरणे निकाली काढली. लोक अदालत यशस्वी होण्यासाठी विधी सेवा प्राधिकरणासह मुख्य अभियंता चंद्रमणी मिश्रा, अधीक्षक अभियंते कार्यकारी व उपविभागीय अभियंते, विधी विभागाने विशेष प्रयत्न केले.

## शेठ बी. एम. पडवळ विद्यालयाच १००% निकाल

**ठाणे :** शेठ बी. एम. पडवळ विद्यालयाच्या इंग्रजी माध्यम विभागाने गेले १८ वर्षे दहावीचा १००% निकालाची उज्ज्वल परंपरा याही वर्षी कायम राखलीआहे. यावर्षी शाळेत प्रथम क्रमांक कु श्रध्दा सुर्यवंशी ९६.४०%, द्वितीय क्रमांक कु. पैर्णिमा अनिल चासकर ९६.२०%, तेजस्वी पडाळकर ९४.२०% सह उत्कृष्ट गुण संपादन केले. पडवळ नगर एज्युकेशन सोसायटीच्या सदस्यांनी, विद्यालयाच्या मुख्याध्यापकांसह शिक्षकवर्ग उस्फूर्त आंनद व्यक्त करुन सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन आणि त्यांच्या उज्ज्वल भविष्याकरिता हार्दिक शुभेच्छा व्यक्त केल्या आहेत.




अंबरनाथ नगर परिषदेमध्ये चतुर्थश्रेणी कर्मचारी शैलेश साळुंखे यांनी Global Powerlifting Bodyliftinng International Championship, Dubai येथे ९८ किलो वजनी गटात स्कॉड्स ,बेंच प्रेस, पॉवर लिफ्टिंगमध्ये प्रथम पारितोषिक पटकावले . पटकावलेल्या पारितोषिकामुळे त्यांना मिनी ऑलिम्पिक खेळण्याची संधी मिळाली आहे . अंबरनाथ नगर परिषदेचे मुख्याधिकारी उमाकांत गायकवाड यांनी त्यांचे अंबरनाथ नगर परिषदेच्या वतीने कौतुक केले आहे व पुढील वाटचालीसाठी शुभेच्या दिल्या .

## सैन्याच्या सन्मानार्थ ठाण्यात निघाली भव्य तिरंगा रॅली

**◆ ठाणे (प्रतिनिधी):**

भारतीय सैन्याने पाकिस्तानाला धडा शिकवला आणि काश्मीर मधील दहशतवादी हल्ल्याचा बदला घेतला भारतीय नागरिकांचे रक्षण करणारे आपले जवान यांचे आभार मानण्यासाठी आणि त्यांचं मनोबल वाढवण्यासाठी शिवसेनेच्या वतीने बुधवारी ठाणे शहरात भारतीय सैन्याच्या सन्मानार्थ एक भव्य तिरंगा रॅली काढण्यात आली. या रॅलीत महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे स्वतः यात सहभागी झाले होते.मंत्री प्रताप सरनाईक, खासदार नरेश म्हस्के, मा.आमदार रवींद्र फाटक, यांच्यासह शिवसेनेचे अनेक पदाधिकारी, नगरसेवक, कार्यकर्ते, शिवसैनिक आणि स्थानिक नागरिक सामील झाले होते. या रॅलीदरम्यान 'वंदे मातरम', 'भारत माता की जय' अशा देशभक्तीपूर्ण घोषणा देण्यात आल्या. यावेळी सर्वांच्याच चेहऱ्यावर देशासाठी अभिमान आणि सैन्याच्या प्रति आदराची भावना झळकत होती. साडेतीन तास ही रॅली ठाण्याच्या विविध भागातून मार्गक्रमण करत होती. शासकीय विश्रामगृहासमोरून रॅलीची सुरुवात झाली. ठाणे महानगरपालिका, गोखले रोड, वागळे इस्टेट, इंदिरानगर पाचपाखाडी या मार्गांवरून तिरंगा फडकवत, ही रॅली पुढे सरकली आणि रॅलीचा समारोप ठाणे महानगरपालिका भवनासमोर झाला.



### एकनाथ शिंदे, प्रताप सरनाईक, नरेश म्हस्के यांचा प्रमुख सहभाग

## आमदार मंदाताई म्हात्रे यांनी जिल्हाध्यक्ष डॉ. राजेश पाटील यांचे केले अभिनंदन

**◆ नवी मुंबई (प्रतिनिधी):**

भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेशातील संघटनात्मक जिल्ह्यांकरिता जिल्हाध्यक्षांची घोषणा करण्यात आली. यावेळी नवी मुंबई भाजपा जिल्हाध्यक्षपदी डॉ. राजेश पाटील यांची नियुक्ती झाली असून आमदार मंदाताई म्हात्रे यांनी त्यांचे अभिनंदन केले.

यापूर्वी डॉ. राजेश पाटील यांनी शिक्षण संस्था, कॉलेज शाळा यांच्या माध्यमातून नागरिकांना रोजगार मिळावा म्हणून अनेक उपक्रम डॉ. राजेश पाटील यांच्या माध्यमातून राबविले गेले. या सर्व कार्यांची दखल घेत भारतीय जनता पार्टीने ओबीसी व आगरी समाजाचे नेतृत्व म्हणून डॉ. राजेश पाटील यांची जिल्हाध्यक्ष म्हणून नेमणूक करण्यात आली.



नवी मुंबईचा इतिहास, भूगोल व तसेच सांस्कृतिक जाण असलेले व्यक्तिमत्व म्हणून राजेश पाटील यांच्याकडे पाहिले जाते.

यावेळी आमदार मंदाताई म्हात्रे यांच्या समवेत माजी पोलीस पाटील दिलीप पाटील, प्रमोद घरत, बेलापूर मंडळ अध्यक्ष अजय सिंग, सीवूड्स-करावे मंडळ अध्यक्ष सुधीर जाधव, नेरूळ (पूर्व) मंडळ अध्यक्ष कुणाल महाडिक, नेरूळ (पश्चिम) मंडळ अध्यक्ष भास्कर यमगर, सानपाडा-जुईनगर मंडळ अध्यक्ष सुनील कुरकुटे, तुर्भे मंडळ अध्यक्ष पंकज आंबीरकर, वाशी मंडळ अध्यक्ष विकास सोरटे तसेच असंख्य पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## महापालिकेच्या शाळांचा ९१.९८ टक्के निकाल

**ठाणे :** ठाणे महापालिकेच्या एकूण २३ माध्यमिक शाळांचा निकाल ९१.९८ टक्के लागला आहे. गतवर्षी हे प्रमाण ८३.९४ टक्के एवढे होते. या वर्षी महापालिकेच्या चार माध्यमिक शाळांचा निकाल १०० टक्के लागला आहे. गतवर्षी तीन शाळांचा निकाल १०० टक्के लागला होता. महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले असून भविष्यातील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. यंदा ठाणे महापालिकेच्या माध्यमिक शाळांमधून १३२३ विद्यार्थी दहावीच्या परीक्षेस बसले होते. त्यापैकी १२१७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. शाळा क्रमांक १५, किसननगर, शाळा क्रमांक १६, सावरकर नगर, शाळा क्रमांक १८, ज्ञानसाधना, शाळा क्रमांक १९ सावरकर नगर यांचा निकाल १०० टक्के लागल्याची माहिती उपायुक्त (शिक्षण) सचिन सांगळे यांनी दिली.

## महावितरण मुख्य अभियंता पदी संजय पाटील रूजू




**◆ ठाणे (प्रतिनिधी):**

महावितरणच्या वांद्रे येथील मुख्य कार्यालयात नवीकरणीय उर्जा विभागात मुख्य अभियंतापदी कार्यरत असलेले संजय पाटील यांची बदली भांडूप नागरी परिमंडलाचे मुख्य अभियंता पदी करण्यात आली आहे. पाटील यांनी या पदाचा पदभार स्वीकारला आहे. यावेळी भांडुप परिमंडळामध्ये प्रत्येक विभागातील कर्मचारी व अधिकाऱ्यांनी आपली कामाची पूर्णपणे जबाबदारी घेऊन काम करावेत जेणेकरून आपल्या परिमंडलातील इतर कार्यालयांना चांगले काम करण्यासाठी प्रोत्साहन मिळेल. आपण एक टीम म्हणून काम करून भांडूप परिमंडलात अजून काही चांगले बदल नक्कीच घडवून आणू व ग्राहकांना चांगली सेवा देण्यासाठी व महावितरणचा महसूल वाढ करण्यासाठी कार्यरत राहू असे मुख्य अभियंता संजय पाटील यांनी यावेळी सांगितले.

### दहिसर ते भाईंदर मेट्रो मार्ग क्र.९ लवकरच होणार सुरू

# मुख्यमंत्र्यांनी केली काशी गाव ते दहिसर मेट्रोची चाचणी

**◆ भाईंदर (वार्ताहर) :**

दहिसर ते भाईंदर मेट्रो मार्ग क्र.९ च्या पहिल्या टप्प्यांत सुरू होणाऱ्या दहिसर ते काशी गाव दरम्यानच्या मेट्रो मार्गाची तांत्रिक चाचणी बुधवारी दुपारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एकनाथ शिंदे, अजित पवार या दोन्ही उपमुख्यमंत्र्यांसह केली. ती यशस्वी झाली आहे.

मीरा-भाईंदर मुंबई शहराला जोडण्यासाठी दहिसर ते भाईंदर मेट्रो मार्ग क्र.९ ला शासनाने मंजुरी दिल्यावर ९ सप्टेंबर २०१९ ला मेट्रोचे काम सुरू झाले होते. या कामाला उशीर झाल्याने येथील नागरिक आतुरतेने वाट पाहत होते.

त्यांचे स्वप्न पूर्णत्वात होत आहे. दहिसर ते भाईंदर मेट्रो मार्ग क्र.९ च्या पहिल्या टप्प्यांत सुरू होणाऱ्या दहिसर ते काशी गाव दरम्यानच्या मेट्रो मार्गाची तांत्रिक चाचणी बुधवारी दुपारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.

सदर मेट्रो त्यावेळी त्यांनी पुढील दोन वर्षांत मेट्रोचा संपूर्ण प्रकल्प पूर्ण होणार असल्याचे सांगितले. दहिसर ते भाईंदर मेट्रो मार्ग क्र.९ हा डबल डेकर प्रकल्प असून रस्ता, त्यावर उड्डाण पूल आणि त्यावर मेट्रो धावणार आहे. पहिल्या टप्प्यात दहिसर ते काशीगाव स्थानक कही महिन्यात सुरू होइल तर दुसऱ्या टप्प्यात काशीगाव ते नेताजी सुभाषचंद्र बोस मैदान स्थानकापर्यंत डिसेंबर २०२५ पर्यंत सुरू करण्याचे प्रयत्न आहेत. स्थानिक आमदार नरेंद्र मेहता आणि आमदार तथा विद्यमान मंत्री प्रताप सरनाईक यांनी मेट्रो प्रकल्पसाठी सातत्याने पाठपुरावा केला होता.





# नवी मुंबई महानगरपालिका २३ माध्यमिक शाळांचा निकाल ९४.७२ टक्के

### अंशिका यादव ९५ टक्के गुण संपादन करीत नमुंमपा शाळांमध्ये सर्वप्रथम

**◆ नवी मुंबई (प्रतिनिधी) :**

नवी मुंबई महानगरपालिका माध्यमिक शाळांचा निकाल ९४.७२ टक्के एवढा लागला आहे. यामध्ये नवी मुंबई महानगरपालिका शाळा क्रमांक १०१४ राजर्षी छत्रपती शाहू महाराज विद्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर, रबाळे येथील अंशिका अंगद यादव ही विद्यार्थिनी ९५ टक्के गुण संपादन करुन महानगरपालिकेच्या २३ माध्यमिक शाळांमध्ये सर्वाधिक गुण मिळवून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाली. महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी तिचे व सर्वच गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील सर्व माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनांच्या शाळांमधून विद्यार्थ्यांनी दहावीची शालांत परीक्षा दिली. या परीक्षेत नमुंमपा माध्यमिक २३ शाळांतील २६९८ विद्यार्थी सहभागी झाले होते. त्यापैकी २५६८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून महानगरपालिका शाळांचा एकूण निकाल ९४.७२ टक्के एवढा लागलेला आहे.

नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे, अतिरिक्त आयुक्त सुनील पवार, शिक्षण विभागाच्या उपआयुक्त संघरत्ना खिल्लारे आणि शिक्षण अधिकारी अरुणा यादव यांनी उज्ज्वल यश संपादन करणाऱ्या यशस्वी विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन केले आहे. तसेच शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षक यांचेही अभिनंदन करीत भविष्यातील अधिक चांगल्या कामगिरीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# सरन्यायाधीश पदावर महाराष्ट्राचे 'भूषण'

महाराष्ट्राचे सुपुत्र भूषण रामकृष्ण गवई यांनी भारताचे ५२ वे सरन्यायाधीश म्हणून बुधवारी शपथ घेतली. त्यांचा कार्यकाल सहा महिने, दहा दिवसांचा असणार आहे. कालावधी कमी असला तरी, देशाच्या सर्वोच्च न्यायालयाच्या प्रमुख पदावर बसण्याचा मान पुन्हा एकदा मराठी माणसाला मिळत असल्याने, त्याचे मूळ गाव असलेल्या अमरावतीपासून, वकिलीची प्रॅक्टीस केलेल्या नागपुरात आज आनंदोत्सव साजरा झाला.

भारताच्या सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशपदी विराजमान होणारे न्या. भूषण गवई हे सहावे मराठी व्यक्ती ठरले. याआधी न्या. यशवंत चंद्रचूड, न्या. शरद बोबडे, न्या. धनंजय चंद्रचूड, न्या. प्रल्हाद बालाचार्य गजेंद्रगडकर आणि न्या. उदय उमेश लळित यांनीही हे पद भूषवले आहे. के. जी. बालाकृष्ण यांच्यानंतर सरन्यायाधीश पदावर कार्य करणारे ते दुसरी दलित व्यक्ती ठरले आहेत. केरळ व बिहारचे माजी राज्यपाल रा. सू. गवई यांचे भूषण गवई हे ज्येष्ठ पूत्र आहेत. भूषण गवई यांचे प्राथमिक शिक्षण अमरावतीत झाले. त्यांनी मुंबईतून कायद्याचे शिक्षण घेतले. काही काळ मुंबई हायकोर्टात स्वतंत्र प्रॅक्टिस केली होती. त्यानंतर ते नागपूरला स्थायिक झाले. मुंबई हायकोर्टाच्या नागपूर खंडपीठात त्यांनी वकिली सुरू केली. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात सहाय्यक सरकारी वकील आणि अतिरिक्त सरकारी वकील म्हणून सुद्धा त्यांनी काम केले आहे. त्यानंतर ते मुंबई उच्च न्यायालयाचे कायमस्वरूपी न्यायमूर्ती झाले. १४ वर्षे मुंबई उच्च न्यायालयात न्यायमूर्ती राहिल्यानंतर त्यांना २०१९ मध्ये सुप्रीम कोर्टाचे न्यायमूर्ती म्हणून बढती मिळाली होती. आता त्यांना सर्वोच्च न्यायालयाच्या प्रमुख पदावर बसण्याची संधी मिळाली आहे.

लोकशाहीतील चार स्तभांपैकी, न्यायव्यवस्था हा महत्त्वाचा स्तंभ मानला आहे. देशाचा कारभार हा संविधानानुसार सुरू आहे का यावर देखरेख ठेवण्याचे काम हे सर्वोच्च न्यायालयाचे आहे. त्यामुळे, संसदेत एखादे विधेयक बहुमताने मंजुर करून त्याचे राष्ट्रपतीच्या स्वाक्षरीने कायद्यात रूपांतर होत असले तरी, भारताच्या घटनेच्या चौकटीला हा नवा कायदा बाधा येत असेल, तर त्याला स्थगिती देण्याचे किंवा तो रद्दबातल करण्याचे अधिकार हे सर्वोच्च न्यायालय कायद्याच्या कसोटीवर करत असते. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयात न्यायाधीश पदावर बसलेल्या व्यक्तीकडून सर्वसामान्य नागरिकांच्या मोठ्या अपेक्षा राहिलेल्या आहेत. प्रशासनाकडून न्याय मिळाला नाही, तर कोर्टाची पायरी चढण्याचा निर्णय घेतला जातो, त्यामागे आजही सर्वोच्च न्यायालयाची विश्वासर्हता कायम आहे हे दिसून येते.

कोणत्याही न्यायालयात न्यायदानाचे पवित्र कार्य करणारी व्यक्ती ही निपक्षःपाती असावी, असा अलिखित नियम आहे. न्यायमूर्ती भूषण गवई यांच्या वडिलांची राजकीय पार्श्वभूमी असली, तरीही भविष्यात निवृत्तीनंतर कोणतेही पद स्वीकारणार नसल्याचे त्यांनी शपथ घेण्याअगोदरच स्पष्ट केले होते, यातून त्यांच्यातील प्रामाणिकपणा दिसून येतो. सर्वोच्च न्यायालयात एका प्रकरणाच्या सुनावणीच्या वेळी भूषण गवई यांनी सांगितलेला किस्सा त्यांच्या कारकिर्दीला कुठेही डाग लागू नये, याची काळजी घेणारा वाटला. माझे वडील पूर्वी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी होते. त्यामुळे, तुम्हाला माझ्या बाबतीत काही अडचण असेल, तर स्पष्ट सांगा. मी त्या खंडपीठातून स्वतला वेगळे करतो, असे भूषण गवई यांनी याचिकाकर्त्याला सांगितले होते; परंतु, पक्षकारांनी गवई यांच्यावर कोणताही संशय न घेता, तुम्ही न्यायमूर्ती असताना जो न्याय द्याल तो आम्ही मान्य करू असे सांगितले. या एका उदाहरणावरून त्यांची कर्तव्यनिष्ठा दिसून येते. आपण एवढ्या मोठ्या पदावर विराजमान होत असताना, व्यक्तींचे पाय जमिनीवर असणे असे म्हणतात. तो गुण त्यांच्यात दिसला. भूषण गवई हे शपथ घेण्यासाठी राष्ट्रपती भवनात आले. शपथ घेण्यापूर्वी ते पुढच्या रांगेत बसलेल्या मान्यवरांना भेटायला गेले. पंतप्रधान नरेंद्र मोदी, माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद, मावळते सरन्यायधीश संजीव खन्ना, उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांच्या अनेकांना त्यांनी अभिवादन केले. पण, याच रांगेत पुढे असलेल्या त्यांच्या आई कमलाबाई गवई यांना साष्टांग दडवंत घालून त्यांच्या पायांना स्पर्श करून आशीर्वाद घेतला.

या मातेने मुलाखतीत भूषण गवईबद्दलचा एक किस्सा सांगितला होता. त्यावेळी आमच्या कुटुंबाची आर्थिक स्थिती बेताची होती. १९७१ च्या भारत-पाकिस्तान देश युद्धावेळी अमरावतीच्या फ्रेजारपुरा भागात भारतीय जवानांसाठी भूषण भाकरी बनवायलाही मदत करत होता. देशप्रेमाचे बाळकडू त्याला लहानपणापासून मिळाले आहे. आता लोकशाही टिकविण्यासाठी न्यायालयाच्या माध्यमातून जे करता येईल, ते भूषण चांगले करतील, असा विश्वास त्यांच्या आई कमलाबाई यांनी व्यक्त केला आहे. गवई यांना मिळालेल्या संधीचे ते सोने करतील, असा विश्वास महाराष्ट्रातील तमाम मराठीजनांना आहे. महाराष्ट्राला रामशास्त्री प्रभुणे यांचा वारसा लाभलेला आहे. रामशास्त्री हे १८ व्या शतकातील मराठा साम्राज्याचे सरन्यायाधीश होते. रामशास्त्रींनी रघुनाथराव पेशवे तसेच इतर सरदारांच्या दबावाला न जुमानता नारायणराव पेशव्याच्या खुनाबद्दल रघुनाथराव पेशव्यास जबाबदार ठरवले होते आणि त्यांनी मृत्युदंडाची शिक्षा फर्मावली होती. तेव्हापासून न्यायदानात रामशास्त्री बाणा असायला हवा, असे म्हटले जाते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशातील प्रत्येक व्यक्ती केंद्रबिंदू राज्य घटनेची निर्मिती केली. भूषण गवई हे डॉ. आंबेडकर यांच्या पावलावर पाऊल टाकत कोण मोठं, कोण लहान हे न पाहता लोकाभिमुख राहून न्याय देतील, नागरिकांच्या हक्कांची जपणूक करतील, अशी त्यांच्याकडून अपेक्षा व्यक्त करूया.

# नेता मिळे आम्हा ऐसा नरसिंह जणू भासे जैसा!




दोन दिवसांपूर्वी पाकिस्तानच्या विनवण्या ऐकून ऑपरेशन सिंदूर भारताने स्थगित केले, अशा बातम्या पसरवत मोदी विरोधी गँगने एकदम उचल खाल्ली. सकाळ, दुपार, संध्याकाळ पाकिस्तानचे गुण गाणारे, मोदींचा पराभव करण्यासाठी पाकिस्तानला आपल्याबरोबर घेऊ पाहणारे, शांतीची बोलणी झाली पाहिजे सांगणारे, अतिरेक्यांना हाफीज साब म्हणणारे आणि पाकिस्तानी अतिरेक्यांनी केलेल्या हल्ल्यात हिंदू संघटनांना गोवण्यात अग्रेसर असणारे सगळे मोदीजी यांचे कसे चुकले हे सांगू लागले.

इंदिरा गांधींचे फोटो सोशल मीडियामध्ये झळकू लागले. तुलना सुरू झाली. मोदी यांच्या छातीची मापे घेण्याची स्पर्धा सुरू झाली. खरगे, राहुल बाबा यांना संसदेचे विशेष अधिवेशन बोलवायचे डोहाळे लागले. पण हे काँग्रेसी, ही डावी इकोसिस्टीम आपल्या भूतकाळात झाकायला तयार नव्हती.

सन १९४८! देश स्वतंत्र झाला होता. फाळणीच्या जखमा अजून ओल्याच होत्या आणि इतक्यात पाकिस्तानी टोळधाड काश्मीरवर हल्ला करत आली. थेट श्रीनगरपर्यंत पोहेचत होती. भारतीय सेनेने अपुऱ्या युद्धसामग्री असताना त्यांना मागे रेटले. भारतीय सैन्य त्यांना काश्मीरमधून बाहेर काढण्यासाठी पराक्रमाची, शौर्याचे परिसीमा गाठत होता. आमचे शांतीदूत पंतप्रधान युनोमध्ये गेले. जैसे थे स्थितीचा आदेश निघाला. परिणाम म्हणजे आमच्या काश्मीरचा एक भाग POK झाला आणि LOC आमच्यावर लादली गेली.

सन १९६२ ! हिंदी-चिनी भाई-भाई नारे लगावणारे, कबूतर उडवणारे शांतीदूत! ना त्यांनी सैन्याला बळ दिले. ना शत्रूंना ते ओळखू शकले. परिणाम ६२ मधील युद्धात आमचे शूर सैनिक साधना अभावी मारले गेले. त्यांचे शौर्य अपुऱ्या साधनसामग्रीमुळे वाया गेले आणि आम्ही आमचे हजारो एकर क्षेत्र गमावून बसलो.

हे तेच शांतीदूत पंतप्रधान होते. ज्यांनी माय हार्ट गोस विथ आसामी असे म्हणून आसामी भारतीयांचे भवितव्य दैवावर सोडले होते. हे तेच शांतीदूत होते ज्यांनी गवताचे पाते ही उगवत नाही म्हणून चीनला जमीन बहाल केली होती. हे तेच शांतीदूत होते ज्यांनी कृष्ण मेननसारख्या चीन धार्जिणा माणसाला संरक्षण मंत्री करून चीनचे युद्ध ओढवून घेतले होते.

सन १९६५ : पाकिस्तानने भारतावर आक्रमण केले. भारतीय सेनेने पराकाष्ठा करत पाकिस्तानवर विजय मिळवला. ताश्कंद करार झाला. लाल बहादूर शास्त्री यांच्यावर दडपण आणले गेले. त्यांचा संशयास्पद मृत्यू झाला. आम्ही जिंकलेली जमीन तर गमावलीच, पण लाल बहादूर शास्त्री यांच्यासारखा सुपुत्र गमावला. परिणाम आमच्या देशात बाह्य हस्तक्षेप वाढला.

सन १९७१:भारत-पाकिस्तान युद्ध! आम्ही बांगलादेश निर्मिती करताना पाकिस्तानमध्ये फूट घडवून आणली. पण कायमस्वरूपी घुसखोर समस्या निर्माण केली. आमच्या ताब्यात ८०००० सैनिक शरण आले होते. त्यांना बिनशर्त सोडून देताना साधी pok परत करण्याची मागणी नाही केली. युद्धात जिंकून तहात आम्ही हरलो.

या युद्धात खरे तर हिरो होते जनरल माणेकशॉ! पण देशाच्या पंतप्रधान म्हणून इंदिराजी यास त्याचे श्रेय आम्ही दिले. त्यानंतर सिमला करार करून भारतीयांच्या आकांक्षांवर पाणी फिरवणाऱ्या याच पंतप्रधान होत्या.

२६/११, ९३ बॉम्ब स्फोट, अक्षरधाम हल्ला, विविध बाँब स्फोट यात अतिरेक्यांना धर्म नसतो याचे तुणतुणे वाजवणाऱ्यांनी भारतीय नागरिकांची सुरक्षा आणि देशाचे सीमा संरक्षण टांगणीवर टाकले होते. देशाच्या जमिनीविषयी, तिच्या सीमांच्या विषयी आणि आत्मसन्मानाविषयी एक निश्चित अभिमान आणि चाड लागते, तर युद्ध आणि चर्चा या देशाच्या हिताचे परिणाम साधतात. दुर्दैवाने देशाला फाळणीत ढकलून देणाऱ्या पक्षाच्या सरकारने कधीही देशाच्या संरक्षण सिद्धतेला महत्त्व दिले नाही. संरक्षण खरेदी हा पैसे कमावण्याचा धंदा बनवला आणि त्यामुळेच शस्त्रात्र बाबतीत कधीही आत्मनिर्भर बनवले नाही. शास्त्रज्ञ आणि सैन्य अधिकारी यांना मोकळीक दिली नाही. परिणामी भारत हा संरक्षण सिद्धतेत मागेच राहत गेला आणि त्या बाबतीतले परावलंबित्व वाढत गेले.



रवींद्र मुळे
अहिल्या नगर

अटलजी यांच्या काळात आम्ही अण्वस्त्रधारी बनलो. जगाने आम्हाला दडपण आणले पण अटलजींनी ती सर्व दडपणे झुगारून देशात संरक्षण क्षेत्रात एका क्रांतीला भारतरत्न एपीजे अब्दुल कलाम यांच्या पुढाकाराने जन्म दिला. क्षेपणास्त्रे बनायला लागली. डाव्या इकोसिस्टीमने कलाम यांना 'मिसाईल मॅन'असे उपरोधाने म्हणण्यास सुरुवात केली. पण याच क्षेपणास्त्र नीतीने आम्हाला अजेय, अजिंक्य बनवले असे लक्षात येते. मोदीजींच्या काळात तर संरक्षण सिद्धतेला अजून प्राधान्यक्रमाने सुरुवात झाली. मध्यंतरी यूपीए सरकारने त्याची गती रोखली होती, पण मोदीजी यांनी अधिक गतीने त्याला सुरुवात केली.

कारगिल युद्धात अटलजी यांना अमेरिकन पोलीस, क्लिंटन यांनी अण्वस्त्र युद्धाचा धोका आहे, हे सांगितल्यावर भारत निम्मा होईल, पण उद्याच्या सूर्योदयाला पाकिस्तान देश जगाच्या नकाशावर राहणार नाही हे अटलजी यांनी त्यांना ठणकावून सांगितलेले उत्तर आणि आता न्युक्लिअर ब्लॅकमेलिंग खपवून घेतले जाणार नाही, हे मोदीजी यांचे उद्गार हे एकाच राष्ट्रीय स्वाभिमानी जात-कुळातील आहेत हे लक्षात घ्यावे लागेल. या सगळ्या पार्श्वभूमीवर जेव्हा ऑपरेशन सिंदूर या सध्याच्या चालू असलेल्या सैन्याच्या कारवाईचा आणि कालच्या पंतप्रधान मोदीजी यांच्या भाषणाचा विचार करतो तेव्हा भारतीयांचा ऊर अभिमानाने भरून येतो. असे नेतृत्व आणि असे विजीगिषू सैन्यदल जगात आपला दबदबा प्रस्थापित करण्यात यशस्वी झाले आहे.

१९८२/८५ पासून Jklf नावाच्या संघटनेपासून काश्मीर अतिरेकी कारवायांना अधिक गती मिळाली. रवींद्र म्हात्रे या भारतीय अधिकाऱ्याची ब्रिटनमध्ये हत्या झाली. त्यानंतर अनेक पंडितांची हत्या, सातत्याने सर्व भारतभर अतिरेकी कारवायांना ऊत आला होता. खलिस्तान चळवळीची त्यात भर पडली... अनेक वेळा शाब्दिक धमक्या देऊन झाल्या . शिशुपाल अपराध करत होता आणि १०० अपराध होण्याची सुदर्शन चक्र वाट बघत होते. पहलगाम हा १०० वा अपराध ठरला आणि पाकिस्तान विनाशाच्या दिशेने वाटचाल करू लागला.

अमेरिका, तुर्किस्तान, चीन कुणीही मध्यस्थी केली तरी आतंकवाद हे युद्ध समजले जाईल हा सज्जड दम , आता फक्त PoK वर चर्चा, टेरर आणि टॉक, टेरर आणि ट्रेड एकत्र चालणार नाही, रक्त आणि पाणी एकाचवेळी वाहणार नाही या मोदींच्या भाषणातील वाक्यांनी केवळ पाकिस्तान नाही, तर विश्व समुदाय हादरून गेला असेल.

वास्तविक आतंक विरोधातील ही लढाई जगाच्या वतीने भारत लढत आहे, त्यासाठी प्रचंड नुकसान सहन करत आहे. अशावेळी भारताच्या बाजूने उभे राहण्याऐवजी अमेरिका, चीन दुट्टप्पी धोरण ठेवत आहे. हे माणुसकीच्या आणि जगाच्या दृष्टीने खूप नुकसानकारक आहे. युद्ध जसे जगाला परवडणारे नाही, तसे आतंकवाद पण जगाला परवडणारा नाही हे ठणकावून सांगणारे पंतप्रधान आम्हाला लाभले आहेत याचा आम्हाला अभिमान आहे.

शेवटी, सोमवारी बौद्ध पौर्णिमा होती. बुद्धाने जगाला शांतीचा संदेश दिला. पण बुद्धांचे पुतळे उद्ध्वस्त करणारी वृत्ती फोफावणार असेल, तर त्याचा बंदोबस्त करणारी शक्ती पण आवश्यक आहे. त्यामुळे जशी बौद्ध पौर्णिमा होती त्या अगोदरच नरसिंह जयंती पण होती आणि भारत हा बौद्धांचा देश आहेच पण मातलेल्या हिरण्यकश्यपूना यमसदनास पाठवणारा नरसिंहांचा पण देश आहे हे विसरता येणार नाही.

मोदी द्वेषाने आंधळ्या झालेल्या डाव्या आणि काँग्रेसी पाकिस्तान धार्जिणा इकोसिस्टीमपेक्षा ओवेसींनी जी भूमिका घेतली ती जास्त स्वागतार्ह म्हणावी लागेल. तथाकथित बिळात लपलेले सेलिब्रेटी छोट्या-छोट्या गोष्टींवर ट्विट करतात, पण त्यांना भारतीय सैन्याचे कौतुक करावे वाटले नाही हे पण जनतेच्या लक्षात आले आहे. स्वरा भास्करसारखी तिनपाट बाई मात्र सैन्यदल आणि भारतीयांना अपशकून करण्यात आघाडीवर आहे हे पण जनतेच्या लक्षात आले आहे.

मोदीजी यांनी दुर्लक्ष करत, अनुल्लेखाने जगाचे पोलीस बनलेल्या अमेरिकेला आपली जागा तर दाखवली पण आम्ही आता शस्त्र निर्यात करणारे आहोत आणि आमचे ब्रह्मास्त्र ब्रह्मोस हे आमचे संरक्षण करण्यात सिद्ध आहे हे स्पष्ट केले आहे.

एकूणच पहलगाममधील घटनेनंतर भारतीयांची निर्माण झालेली एकजूट, त्यानंतरचे ऑपरेशन सिंदूर, पाकिस्तानचे उद्ध्वस्त झालेले अतिरेकी अड्डे, एअर बेस कॅम्प आणि सैनिक कॅम्प आणि काल पंतप्रधान मोदीजी यांचे भाषण यातून भारतीय नरसिंह जागृत झाला आहे, याची जाणीव संपूर्ण जगाला आणि भारतातील देशद्रोही, छद्मी धर्मनिरपेक्ष लोकांना पण धडकी भरवणारी आहे. मोदीजी यांची भाषण करतानाची देहबोली ही जणू मुलतानची भूमी त्यांना खुणावत आहे अशी होती, अर्थात वाचकांच्या माहितीसाठी, नरसिंह अवतारभूमी आणि भक्त प्रल्हाद यांची जन्मभूमी मुलतान आहे. स्वातंत्र्य मिळाल्यावर गेल्या ७८ वर्षांतील जागृत झालेला हा नरसिंह अवतार भारताला स्वातंत्र्याचा खरा अर्थ सांगणारा आणि अखंड भारताच्या स्वप्नाकडे वाटचाल करणारा आहे.

# छत्रपती शिवरायांना मानाचा मुजरा!

महाराष्ट्राचे आराध्य दैवत, तमाम हिंदुस्थानची अस्मिता असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांनी साडेतीनशे वर्षांपूर्वी स्वराज्य निर्मितीसाठी जो पराक्रम गाजवला त्याची साक्ष गडकिल्ल्यांच्या रूपाने आजही दिसत आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या कोकणातील मालवणमध्ये सिंधुदुर्ग किल्ल्यांच्या रूपाने इतिहासाची साक्ष देत समुद्रलाटांचा सामना करत छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाच्या पाऊलखुणांचं दर्शन यानिमित्ताने होते. सिंधुदुर्ग किल्ल्यासमोरच राजकोट किल्ला आहे. कोकणात रायगडसह अनेक गड, किल्ले आजही उभे आहेत. या गडकिल्ल्यांकडे पाहिल्यावर, गड किल्ल्यांवरील वास्तुशास्त्र आणि वास्तूला देखणेपण कशा रितीने आणले गेले हे या गडकिल्ल्यांमध्ये फिरताना सहज लक्षात येऊन जाते. जसे छत्रपती शिवाजीराजे एक पराक्रमी राजे होते. तसेच ते 'मॅनेजमेंट' गुरूही होते. म्हणून कोणत्याही गडकिल्ल्यांचे बांधकाम हे त्या-त्या वैशिष्ट्यपूर्णतेसाठी प्रसिद्धच आहे. प्रत्येक किल्ल्याची निर्मिती करताना त्या-त्या वेळची आवश्यकता लक्षात घेऊन किल्ल्यांची उभारणी करण्यात आली आहे. साडेतीनशे वर्षांपूर्वी देखील गडकिल्ले उभारताना किती छोट्या-छोट्या गोष्टींचा विचार करण्यात आला आहे हे देखील सहज समजून येते.

समुद्रात उभा असलेल्या सिंधुदुर्ग किल्ल्याच्या निर्मितीवेळी मालवणमध्ये सिंधुदुर्ग किल्ल्याचे बांधकाम साहित्य ठेवण्यासाठी सुरक्षितस्थळ म्हणून राजकोट किल्ल्याची उभारणी करण्यात आली. याच राजकोट किल्ल्यावर ११ मे २०२५ रोजी हिंदुस्थानातील छत्रपती शिवाजी महाराजांचा सर्वात उंच पुतळा उभा करण्यात आला आहे. 'नेव्ही डे'च औचित्य साधून छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारण्यात आला होता; परंतु एक दुर्दैवी घटना घडली. त्याचवेळी राज्यसरकारने जाहीर केले, राजकोट किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांचा देशातील सर्वात उंच पुतळा उभा करण्यात येईल. त्याप्रमाणे मर्यादित कालावधीतच हा पुतळा उभारण्यात आला. राजकोट किल्ल्यावरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे दर्शन घेण्यासाठी, छत्रपतींची आरती म्हणत छत्रपतींना मानाचा मुजरा करण्यासाठी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खासदार नारायण राणे, पालकमंत्री नितेश राणे, आमदार निलेश राणे, आमदार दीपक केसरकर आदी मान्यवरांच्या उपस्थितीत छत्रपतींचे दर्शन व महाराजांची आरती ओवाळून त्यांना मानाचा मुजरा करण्याचा समारंभ ११ मे २०२५ रोजी पार पडला. राजकोट



किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारल्याने निश्चितच कोकणात येणाऱ्या शिवप्रेमींना राजकोट किल्ल्यावर जाऊन दर्शन घेता येणार आहे. नेव्ही डे नंतर कोकणातील विशेषकरून पर्यटकांची येणारी संख्या प्रचंड वाढली आहे. आता तर राजकोट किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारण्यात आला आहे. हा पुतळा दहा फुटांचा चबुतरा त्यावर तलवारीसह ९३ फुटी पुतळा मिळून १०३ फूट उंचीचा हा छत्रपती शिवाजी महाराजांचा हा पुतळा देशातील सर्वात उंच पुतळा आहे. साहजिकच छत्रपती शिवाजी महाराजांना नतमस्तक होण्यासाठी देशभरातून शिवप्रेमी येणारे आहेत. छत्रपती शिवारायांच्या रूपाने महाराष्ट्राची अस्मिता उभी आहे. तमाम मराठीजनांना त्याचा सार्थ अभिमान आहेच. त्याचबरोबर छत्रपती शिवरायांचे आरमार उभारणी कशा पद्धतीने केली होती. त्याच्या आठवणींचीही अनेक स्थळ आहेत. सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्र राजे भोसले यांनी छत्रपतींचा हा पुतळा उभारणी होत असताना फार बारकाईने अनेक गोष्टींवर लक्ष ठेवून होते. सुप्रसिद्ध शिल्पकार रामसुतार यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांचे शिल्पकार पुत्र अनिल सुतार आणि टीमने या पुतळ्याची उभारणी केली. सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिक्षक अभियंता मिलींद कुलकर्णी, कार्यकारी अभियंता किणी, उपअभियंता पाटील या सर्वांनीच छत्रपतींचा हा भव्य-दिव्य पुतळा उभारला जाताना ठराविक मर्यादित कालावधीत पूर्ण करण्याच्या प्रयत्नात मोलाचा वाटा राहिला. पालकमंत्री ना. नितेश राणे, मालवण-कुडाळचे आ. निलेश राणे हे, तर छत्रपतींच्या पुतळ्याच्या बांधकामावर नजर ठेवत सतत आढावा घेत होते. यामुळे महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजितदादा पवार यांनी देखील हिंदुस्थानच्या अस्मितेचा हा विषय असल्याने आवश्यक असणारा निधी तत्काळ उभा करून दिला.



माझे कोकण
संतोष वायंगणकर

कोकणात पर्यटनासाठी येणाऱ्या प्रत्येक पर्यटकाला राजकोट किल्ल्यावर यावेसेच वाटेल. छत्रपती शिवरायांच्या चरणी नतमस्तक व्हाव असं प्रत्येक पर्यटकाला वाटल्यावाचून राहणार नाही. या पुतळयाची भव्य-दिव्यता कोकणातील पर्यटन वाढीलाही चालना देणारी ठरणार आहे. यानिमित्ताने कोकणच्या पर्यटन विकासाचाही एक नियोजनबद्ध आराखडा तयार केला पाहिजे. आणि एक वर्षभराच्या या नियोजन आराखड्यात कोकणातील सर्वच पर्यटनस्थळांचा सर्वांगिण विकास करण्याचा संकल्प महाराष्ट्र शासनाने ठरवला पाहिजे. पर्यटन प्रकल्प विकासातून राज्याच्या तिजोरीत मोठी भर पडू शकते. महाराष्ट्र राज्याच्या अर्थ संकल्पाचा मोठा वाटा उचलण्याची ताकद कोकणातील पर्यटन स्थळात आहे; परंतु कोकणातील पर्यटन विकास नेहमीच महाराष्ट्रातील पर्यटन मंत्र्याच्या उदासिनतेने रखडला आहे.

कोकणातील पर्यटनातून महाराष्ट्राची आर्थिक समीकरणे कशा रितीने झपाट्याने बदलू शकतात याबद्दलची कोणतीही माहिती राज्याच्या पर्यटन विभागाला असण्याची शक्यता कमी आहे. कोकणातील राजकोट किल्ल्यावरील छत्रपती शिवरायांच्या पुतळ्याच्या निमित्ताने कोकणातील छत्रपती शिवाजी महाराज्यांच्या पराक्रमाची साक्ष देणाऱ्या अनेक वास्तू आहेत. त्याची देखील जपणूक केली पाहिजे. शिवसृष्टीदेखील प्रस्तावित आहे. या शिवसृष्टीचे निर्माणदेखील विशिष्ट कालावधीत केल्यास निश्चितच येणाऱ्या पर्यटकांना ही नव्याने उभी राहणारी सृष्टीदेखील पाहता येणारी आहे. भारत सरकारचा पुरातत्त्व विभाग काही करू देण्याच्या मानसिकतेत नाहीत. त्यातही बदल घडण्याची आवश्यकता आहे. छत्रपती शिवाजीराजेंच्या राजकोटवरील पुतळ्याने मालवण शहरालादेखील मोठं महत्त्व प्राप्त झालं आहे.

## राशिभविष्य

गुरुवार,१५ मे २०२५

**|| पंचांग ||**

आज मिती वैशाख कृष्ण तृतीया शके १९४७. चंद्र नक्षत्र ज्येष्ठा. योग शिव ७.०० पर्यंत नंतर सिद्ध,चंद्र राशी वृश्चिक,भारतीय सौर २५ वैशाख शके १९४७ म्हणजेच गुरुवार दिनांक १५ मे २०२५. मुंबईचा सूर्योदय ६.०४, मुंबईचा सूर्यास्त ७.०५, मुंबईचा चंद्रोदय ९.३७, मुंबईचा चंद्रास्त ७.४१, राहूकाळ.

**|| भविष्य ||**

**मेष** : प्रवास योग येतील.

**वृषभ** : सरकारी कामे यशस्वी होतील.

**मिथुन** : सुसंधी निर्माण होतील.

**कर्क** : ज्येष्ठ व्यक्तींचा सल्ला उपयोगी पडेल.

**सिंह** : प्रॉपर्टीची कामे मार्गी लावू शकाल.

**कन्या** : आपल्याला नवी दिशा सापडेल.

**तूळ** : मानसिक अस्वस्थता जाणवेल.

**वृश्चिक**: आरोग्य उत्तम राहील.

**धनू** : चांगल्या लोकांशी संबंध येतील.

**मकर** : आपल्या वर्तणुकीवर नियंत्रण हवे.

**कुंभ** : घरातील सदस्यांना समजावून घ्या.

**मीन** : कौटुंबिक वातावरण खेळीमेळीचे राहील.

जनसंवाद

### कोहलीच्या निवृत्तीने क्रिकेटचे प्रेरणादायी युग संपले

भारतीय क्रिकेट संघाचा लढवय्या माजी कर्णधार विक्रमादित्य सचिन तेंडुलकरनंतरचा भारताचा क्रिकेट ब्रँडअॅम्बेसिडर असलेला महान खेळाडू विराट कोहली याने कसोटी क्रिकेटला अलविदा केले. १४ वर्षे कसोटी क्रिकेटच्या मैदानावर आपल्या फलंदाजीने, नेतृत्वाने आणि जिद्दीने क्रिकेट रसिकांच्या ह्रदयावर अधिराज्य केले. कोहलीचा हा निर्णय केवळ क्रिकेट जगतालाच नाही, तर त्याच्या चाहत्यांनाही धक्कादायक आहे. टी -२० विश्वचषकानंतर कोहलीने टी २० क्रिकेटमधून निवृत्ती घेतली. आपण पुढील काही काळ कसोटी व एकदिवसीय सामने खेळत राहणार असे, म्हटले होते. मग अचानक असे काय घडले की, कोहलीने इंग्लंड दौऱ्याआधी निवृत्त होण्याचा निर्णय घेतला. भारताचा विक्रमादित्य खेळाडू सचिन तेंडुलकर याने काही वर्षांपूर्वी म्हटले होते की, आपले विक्रम विराट आणि रोहित शर्मा मोडतील. पण या दोघांनी निवृत्ती घेतली आहे. सचिनचे विक्रम हे कदाचित विराटने मोडले असते किंवा त्याच्या विक्रमाजवळ गेला असता. कारण कोहलीने अजूनही तंदुरुस्ती राखली आहे. ही तंदुरुस्ती कोहली मैदानावर खेळताना दिसून येत होती. कोहली खेळताना, धावा काढण्यासाठी धावताना, त्याची चपळाई युवा खेळाडूंनाही लाजवेल. कोहली एका भरलेल्या मैदानामध्ये कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती घेताना आवडले असते. तेथे क्रीडा रसिकांनी टाळ्यांच्या कडकडाट झाला असता. पण कोहलीच्या निवृत्तीने भारतीय क्रिकेटमधील एक विचार एक प्रेरणा देणारे युग संपले.

– **सुनील कुवरे,** शिवडी

### मुंबई महापालिका निवडणूका घ्याव्यात

महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका येत्या चार महिन्यात घ्याव्यात असा आदेशच आता सुप्रीम कोर्टाने दिला आहे. राज्यातील पंचायत समित्यापासून ते महापालिकाच्या निवडणुका मागील काही वर्षांपासून त्यांच्या नियोजित वेळेवर होऊ शकल्या नाहीत. मविआच्या काळात यासर्व निवडणुका वेळेवर होऊ शकल्या नाहीत. कधी कोवीड प्रादुर्भाव कारणांमुळे तर कधी ओबीसी आरक्षणनिमित्त झाल्याने राज्यात निवडणूका घेता आल्या नाहीत. पण लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुका वेळेवर झाल्या आहेत. दोन्ही निवडणुकीत मविआला यश संपादन करता आलेले नाही. सर्वोच्च न्यायालयाने जवळजवळ तीन वर्षांनंतर निर्णय दिला आहे की, स्थानिक पातळीवरील म्हणजे नगरपालिका, पंचायत पालिका यांच्या निवडणुका येत्या चार महिन्यांत घेण्यात यावा. पण हाच निर्णय तथा आदेश मुंबई महापालिकेच्या बाबतीत देखील आहे का याबाबतीत स्पष्टता मिळालेली नाही. म्हणूनच तर आर्थिक राजधानी असल्यामुळे मुंबई महापालिकेच्या निवडणुका यापुढे तरी म्हणजे आता तरी घेतल्या गेल्या पाहिजे, असे वाटते.

– **संजय साळगावकर,** कुर्ला, मुंबई

### पावसाची सुखद वार्ता खरी ठरो हीच अपेक्षा!

सध्या संपूर्ण देश तीव्र उष्णतेच्या विळख्यात सापडलेला असताना भारतीय हवामान खात्याने यंदा देशात ९६ ते १०४ टक्के पाऊस पडेल असा अंदाज वर्तवला आहे. ही सुखद वार्ता तीव्र उष्णतेने होरपळलेल्या भारतीय मनावर नक्कीच सुखाचा शिडकावा करणारी आहे. मात्र वास्तवात हवामान खात्याने पावसाचे वर्तवलेले अंदाज अनेकवेळा चुकतात असे दिसून आले आहे. २०२० मध्ये भारतीय हवामान विभागाने नैऋत्य मोसमी पावसाचा पाऊस दीर्घकालीन सरासरीच्या (एलपीए) १०२ टक्के इतका असेल असा अंदाज वर्तवला होता. प्रत्यक्षात सरासरीच्या १०९ टक्के पाऊस पडला. २०२१ मध्ये अंदाज वर्तवला होता १०१ टक्के आणि प्रत्यक्षात पडला ९९ टक्के. २०२२ मध्ये पावसाचा अंदाज दीर्घकालीन सरासरीच्या १०४ टक्के होता. प्रत्यक्षात १०८ टक्के पाऊस पडला. २०२३ मध्ये १०० टक्के पावसाचा केलेला अंदाज चुकला आणि प्रत्यक्षात देशभरात ९५ टक्के इतकाच पाऊस पडला. तर गेल्या वर्षी २०२४ मध्ये प्रत्यक्ष पाऊस अंदाजापेक्षा थोडा जास्तच पडला. गेल्या वर्षी एकूण १०६ टक्के पावसाचा अंदाज वर्तविण्यात आला होता. प्रत्यक्षात १०८ टक्के इतका पाऊस पडला. भारतासारख्या कृषिप्रधान देशात शेतकऱ्यांसाठी पावसाच्या अचूक अंदाजाची खूपच गरज असते. त्यामुळे भारतीय हवामान खात्याच्या यंदाच्या सरासरीच्या अधिक पावसाची सुखद वार्ता खरी ठरो हीच अपेक्षा!

– **प्रदीप शंकर मोरे,** अंधेरी (पूर्व)

### कुलभूषण जाधव यांची सुटका करून घ्यावी

भारत आणि पाकिस्तान यांच्यांतील सशस्त्र संघर्ष थांबला आहे. या संघर्षात भारताने एका पाकिस्तानी वैमानिकाला ताब्यात घेतले आहे. त्याच्या सुटकेची मागणी पाकिस्तानने केली आणि त्याला परत पाठविण्याचा निर्णय भारत सरकारने घेतला तर त्याच्या बदल्यात कुलभूषण जाधव यांची सुटका भारताने करून घेतली पाहिजे. कुलभूषण जाधव भारताचे माजी नौसेना अधिकारी असून नऊ वर्षांपूर्वी त्यांना भारतासाठी हेरगिरी केल्याच्या आरोपावरून इराणमध्ये पाकिस्तानने पकडून पाकिस्तानात आणले. कुलभूषण जाधव यांच्या सुटकेची संधी भारतापुढे चालून आली आहे.

– **निरंजन अ. फलके,** (तळेगाव दाभाडे)

### वातावरणातील घातक बदल.

सगळ्यात जास्त उष्णता मे महिन्यात असते. त्यात थोड्या फार प्रमाणात अवकाळी पाऊस पडला की उष्णता तर वाढतेच आणि उन्हही अंगाला बोचर होते. या सगळ्याला जवाबदार आहे विकास आणि हव्यास. विकासकामे आली की मग ती कोणतीही असो, साधे गावातील घर बांधण्यापासून ते शहरातील उंच इमारती टॉवर असो, नाहीतर गावातील गावकऱ्यांवर जबरदस्ती लादलेले महामार्ग, सागरी मार्ग असो. नाहीतर शहरातील मेट्रो मोनो हायवे... सगळ्यात पहिली कुऱ्हाड चालते ती वृक्षांवर आणि ती ही अती प्रचंड आणि मोठाल्या ज्या वृक्षांचा शंभर शंभर वर्ष त्या जागेवर उभी आहेत तरीही मानवाला विकासाचा हव्यासाची किंमत दरवर्षी वाढणाऱ्या सततच्या उष्णतेने होत आहे.

– **मयूर प्रकाश ढोलम**, जोगेश्वरी

‘आकाशाचा शोध घेत...
मातीचे हात थांबले...
वाऱ्याच्या पंखावर उसासे जडलेले...
संवेदनेच्या तळाशी...
आवाज अस्तित्वहीन निःशब्द...
तरीही उंच भरारी...
माझ्या अस्तित्वाची...’

# ‘आकाशाचा शोध घेत मातीचे हात थांबले’



“आत्मा म्हणजे नक्की काय?” याच विचारांत अडकलेल्या माझ्या लेखणीतून हे काव्य उतरले. पण खरच कुणाला हा प्रश्न पडतो का? मला उमगलेला ‘आत्मा’ म्हणजे वाऱ्यावर उमटणारा निःशब्द शब्द, संवेदनांच्या सावलीत हरवलेली एक ओळख. अस्तित्वाच्या काठावर उभे असलेला एक अनाकलनीय शब्द...म्हणजे आत्मा! मातीच्या कुशीत रुजून आकाशाच्या अथांगतेचा शोध घेणारा एक श्वासांचा प्रवाह. एक संवेदना जणू, एक निःशब्द स्पंदन, कुठेतरी दूर जाणाऱ्या पावलांचा भास. ते स्पर्शाच्या आठवणीतील थरथरणे तरीही आकाशाच्या अंतराळात हरवलेले एक मौन. संवेदना म्हणजे वाऱ्याच्या लयीत विसरलेली ओळख. जेव्हा देह आणि मन एकमेकांत विरघळतात ना तेव्हा त्या तुटलेल्या शब्दांची सावली म्हणजेच जेव्हा भावना केवळ अस्तित्वाचा गूढ ध्वनी होतो, संवेदनांच्या स्पंदनात हरवलेले, वाऱ्याच्या लयीत हलणारे एक मौनाचे संगीत. जन्माच्या तळाशी लपलेली ओळख, तर मृत्यूच्या सावलीत मिटणारी एक गूढ कथा
म्हणजे ‘आत्मा’.

नितळ जगण्याच्या भावनाची मोरपंखी पैठणी म्हणजेच परशुरामी तत्त्वांना भिडताना, देहाच्या कणाकणातून उमटते ती खोलवर अज्ञात हाक, त्या हाकेतच सामावलेले चिरंतन अस्तित्वाचे गूढ. आत्म्याचा हा प्रवास म्हणजेच अवकाशातील एक गूढ प्रवाह, अनामिक स्पंदनात हरवलेली ओळख. ते अर्धवट शब्दांचा अंधार, श्वासांच्या सावलीत लपलेले अस्तित्व. जीवन जगण्याच्या या भावना म्हणजे वाऱ्याच्या लयीत विरघळलेला स्पर्श, एक शांत, तरीही धगधगता असा आक्रोश म्हणजेच मृत्यूपलीकडचा आवाज, एका अश्रूंमध्ये उमटणारा अज्ञात अर्थ.



ऋतुराज
**ऋतुजा केळकर**

कस सांगू तुम्हाला नक्की आत्म्याचा प्रवास तरी कसा असतो ते? अंधाराच्या कुशीत जन्मलेला एक निर्विकार असा प्रवास की, जो श्वासाच्या लयीत थरथरणारे एक अस्पष्ट स्पंदन. अनेकानेक इच्छांची पूर्तता करण्याकरिता आत्म्याने घेतलेला एक आधार की एक धूसर भास. तो मातीला स्पर्श करण्याकरिता होणारी त्याची तडफड आणि देहोत्सवाचे चोचले पुरवता पुरवता घेतलेली झेप आकाशाकडे, आकाशाचा शोध घेण्याकरिता, आत्म्याचा प्रवास सुरू होतो तो मृतीकेतून आणि बनतो आकाशाच्या कुशीत विरघळणारा एक विसरलेला ध्वनी. विसरलेला अश्यासाठी की तो असतो, चिरंतनतेच्या वाऱ्यावर हळुवार उडणारा एक अदृश्य भास, मृत्यूपलीकडेही जगणारा एक मौनाचा श्वास.

अस्तित्व आत्म्याचे काय वर्णू मी? तसं बघायला गेलं तर क्षणात मिटणारे, पण तरी देखील काळाच्या तळाशी खोल ठसलेले. आत्म्याचे अस्तित्व श्वासांच्या लयी पेक्षाही हलके तरीही अनंततेच्या स्पंदनात सजीव असलेले , मातीच्या कुशीत रुजून आकाशाच्या शांततेत हरवलेले. ते आहे ही नाही ही. स्पर्शाच्या पलीकडचा एक अज्ञात ध्वनी. संवेदनांच्या थरथरणाऱ्या धारात वाहत जाणारा, अंधाराच्या कुशीत विसावणारा एक निःशब्द प्रकाश. तो शब्दांत नाही, पण अनुभवाच्या प्रत्येक छटेत झळकणारा. तो मृत्यूपलीकडेही श्वास घेत राहणारा एक मौनाचा प्रवाह. आत्म्याची ओळख तत्त्वांच्या स्पर्शात विरघळते, त्याच्या अस्तित्वाचा शोध भावनांच्या सीमांपलीकडे भरकटतो.

आत्म्याच्या प्रवासाकरिता त्याला आधार घ्यावा लागतो तो शरीराचा. हे शरीर हे अध्यात्मिक दृष्टिकोनातून पाहिल्यास पंचतत्त्वांपासून बनलेले आहे. ती म्हणजे पृथ्वी, जल, अग्नी, वायू आणि आकाश. ही तत्त्वे केवळ शरीराच्या रचनेतच नाहीत, तर आपल्या मानसिक आणि आध्यात्मिक प्रवासातही महत्त्वाची भूमिका बजावतात. पृथ्वी हे मृत्तिका तत्त्व आहे की जे शरीरातील घन पदार्थ, हाडे, स्नायू आणि त्वचा यांचे प्रतिनिधित्व करते. शरीराला पर्यायाने आत्म्याला स्थिरता आणि सहनशक्ती प्रदान करते. आत्मा आणि पृथ्वी हा एक अदृश्य प्रवास आहे. मातीच्या कुशीत मिटणारा आणि अनंताच्या मिठीत झुलणारा. तो धुळीत रुजतो, पण वाऱ्यावर झुलतो, त्याचा स्पर्श शेवटी मातीच्या ओलसर श्वासात विसावतो. आत्म्याला पृथ्वी आकार देते, पण मर्यादेत नाही बंधू शकत. ती त्याचा देह, आणि त्याची ओळख असले तरीदेखील तो मुक्त, अस्पष्ट, गूढ आणि अचल आहे की जो संवेदनांच्या जडत्वात शरीराच्या माध्यमातून पृथ्वीशी बांधलेला आहे. म्हणूनच तो मिटतो आणि उलगडतो, पृथ्वीच्या स्पर्शात हरवूनही आकाशाच्या प्रवाहात वाहणारा एक मौनाचा क्षण बनतो. जरी आत्मा हा पृथ्वी तत्वाने बनलेला असला तरी देखील तो एक काळाच्या सीमारेषांवर विरघळणारी हलकी सावलीआहे हे नक्की. आत्म्याशी निगडीत दुसरे तत्व आहे ते म्हणजे आप म्हणजेच जल तत्त्व.

हे तत्व रक्त, रस, आणि शरीरातील द्रव पदार्थ यांचे प्रतिनिधित्व करते कारण, त्यामुळेच भावनात्मक संतुलन आणि प्रवाहीपणा टिकून राहतो. आत्मा आणि आप तत्त्व हा एक ओलसर प्रवास आहे. भावना आणि स्मरणांच्या तलावात प्रतिबिंबित होणारा. पाण्याच्या लयीत तो हलतो, विरघळतो, कधी शांत तर कधी आक्रंदतो. आत्म्याचा स्पर्श थेंबांसारखा जरी क्षणभंगूर असला तरीही चिरंतन असतो कारण तो सरीत उतरतो आणि अखेरीस अनंताच्या ओढीत हरवतो. पाणी हा त्याचा वाहता आकार असला तरीही तो त्याच्याच निर्मितीची सावली बनून नदीतून प्रवाहित होऊन अखेरीस अनंताच्या ओढीत हरवतो. संवेदनांच्या ओलसर स्पंदनात आत्मा स्वतःचाच अर्थ शोधता शोधता, जलधारांमध्ये मुक्तीचा ध्वनी उमटवीत हरवून जातो.

तिसरे तत्व अर्थातच अग्नी म्हणजेच तेज तत्त्व होय, यामुळे शरीरातील उष्णता टिकून राहते. तसेच हे तत्व पचनशक्ती आणि ऊर्जा यांचे देखील प्रतिनिधित्व करते. अग्नी तत्व हे आत्मज्ञान आणि परिवर्तन याचे देखील प्रतीक आहे. आत्मा आणि अग्नी म्हणजे एक स्फुलिंगाचा स्पर्श, क्षणात झळकणारा आणि क्षणात चिरंतनतेत विलीन होणारा. अग्नी त्याचा प्रकट आक्रोश आहे आत्मा आहे त्याच्या शांत राखेत लपलेला एक मौन की तो जळतो, उजळतो, विलीन होतो आणि पुन्हा जन्म घेतो तो अंधाराच्या तळाशी साठलेली एक श्वासांची धगधग पुनपुन्हा प्रगत करण्या करिता. जरी आग त्याला मुक्त करत असली तरीही त्याच्या अस्तित्वाचे रंग ती उलगडते, पण त्या ज्वालांमध्ये स्पर्शही न होणारी एक निःशब्द हाक असते की ज्यात आत्मा त्या अग्नीच्या लहरींवर झुलतो, तरीही त्याच्या तापातून शांततेचा शोध घेऊन तो उजळतो आणि पुनर्निर्मित होतो तो एक विरघळलेला, विसरलेला ध्वनी, अस्थिर पण चिरंतन नाजूक अग्निशिखेसारखा.

चौथे अर्थातच वायू तत्त्व, की जे श्वासोच्छ्वास, हालचाल आणि विचारशक्ती यांचे प्रतिनिधित्व करते. वायू तत्व जीवनशक्ती आणि चैतन्याचा स्रोत आहे . आत्मा आणि वायू याचा संबंध म्हणजे एक हलका श्वास, अस्तित्वाच्या सीमांना लंघणारा आणि चिरंतनतेच्या लयीत हरवणारा. तो अस्पर्श तरीही पण जाणिवेच्या कुंपणात आपल्या अस्तिवाचा खोल ठसा उमटवून ठेवणारा त्याचा स्पर्श वाऱ्याच्या झुळुकीत लपलेला असतो, तो विसरू म्हणता न विसरता येणारा, आठवण बनून स्वतःला हरवणारा पण तरीही ओळख ठेवणारा .कस आहे ना वायू आत्म्याला झुलवतो, हलवतो, पण धरून नाही ठेवू शकत. त्याच्या लहरींमध्ये आत्म्याचा मौन उमटते. आकाशाच्या कुशीत वाऱ्याच्या लयीत झुलणारा एक क्षण, ज्याचा अर्थ आत्म्याच्या प्रवासात खोलवर दडलेला आहे, म्हणूनच आत्मा वाऱ्यासारखा, अस्वस्थ, मुक्त, तरीही अढळ असून त्याच्या अस्तित्वाचा शोध शब्दांमध्ये नाही, तर अनुभूतीत आहे.

सर्वात शेवटचे आणि पाचवे महत्वाचे तत्व म्हणजे ‘आकाश तत्व’, की जे शरीरातील रिक्त जागा, चेतना आणि आत्म्याशी जोडते. आकाश तत्व हे जीवनातील अंतर्मुखता आणि अध्यात्मिक उन्नतीसाठी महत्त्वाचे. आकाश त्याच्या प्रवासाचा साक्षीदार आहे. त्याच्या अस्तित्वाची सावली आहे.म्हणूनच आत्मा आणि आकाश एकमेकात गुंफलेले असले तरीही निराळे आहेत.

अशा या आत्म्याचा अंत आहे का? हा प्रश्न अखेरीस मनाच्या पटलावर उमटतोच.


बर तो एक प्रश्न की एक सावली? हा देखील एक प्रश्नच आहे. आत्मा हा वाऱ्याच्या ओढीत हरवलेला, तरीही अस्तित्वाच्या तळाशी खोल रुजलेला. तो मिटतो की विरघळतो? नष्ट होतो की मुक्त होतो? काहीच माहिति नाही त्याला मरण नाही हे मात्र नक्की. मृत्यूच्या कुशीत विसावतो तरीदेखील तो चिरंतनतेच्या ओलसर प्रकाशात झळकतो. म्हणूच आत्मा संवेदनांच्या धूसर सीमारेषांवर तरंगणारा एक प्रवाह आहे.

**अखेरीस माझ्याच शब्दात सांगायचं झाल तर,**
**‘आत्मा हा सुद्धा एक भन्नाट प्रवासी,...**
**कधी मातीचा, तर कधी आकाशाचा सोबती...**
**थोडा शहाणा, तर थोडा गोंधळलेला...**
**तरीही मृत्यूपलीकडेही...**
**चालत राहणारा एकांडा वाटसरू...**



# पाहिला डोळेभरी

परमेश्वराचा विस्तार सतत होत राहिलेला आहे. आपण आपले जग आणि परमेश्वर या सर्वच एकमेकांशी अत्यंत जवळचा आणि घनिष्ट संबंध आहे, पण अशा महत्त्वाचा विषयाचा अभ्यास किंवा इतर समाजोपयोगी उपक्रम हाती घेण्याऐवजी काही लोक विचित्र समज सर्वसामान्य लोकांत पसरवून दिशाभूल करतात. काही जण म्हणतात जगबुडी होणार. आम्ही स्पष्ट सांगतो आहोत की कुणीही कितीही



जीवन संगीत
**सद्‌गुरू वामनराव पै**

सांगितले की जगबुडी होणार तरी घाबरून जाण्याचे कारण नाही. अशी जगबुडी कधीही होणार नाही आणि जगबुडी झालीच, तर कोण उरणार आहे जग बुडाले हे सांगायला. काही मूर्ख लोक असे सांगतात की, आमचे ते डोंगरावर स्थान आहे तिथे आम्ही सगळे जाऊन राहणार. अरे मूर्खांनो जग बुडाले, तर तो डोंगर बुडणार नाही का? इतकीसुद्धा अक्कल त्या लोकांना नाही. तो डोंगर कधीही पाण्याखाली जाऊ शकतो.

आता मुंबईचे सुद्धा कधी वाळवंट होईल सांगता येत नाही. ती कधीही पाण्याखाली जाऊ शकते. याचे कारण पर्यावरण बिघडत चाललेले आहे. काही गावे तर पाण्याखाली गेली सुद्धा आहेत. हे सर्व जर आपण पाहिले, तर परमेश्वराच्या शक्तीचा केवळ अंदाज बांधता येतो. मात्र असे असूनही परमेश्वराचे वर्णन जसा आहे तसे, जेवढे आहे तेवढे कोण करू शकेल. कुणीच करू शकत नाही. तो आहे तसा कुणीच सांगू शकत नाही. सत्य म्हणजे त्याचे असणे हे अनंत आहे. त्याचे ज्ञान तेही infinite आहे. आनंद हा ही infinite आहे. गगनाचे प्रावरण म्हणजे त्याला रूप नाही, रंग नाही असा हा डोळेभरी कसा पाहिला.


**सत्यज्ञानानंद गगनाचे**
**प्रावरण, नाही रूप गुण वर्ण**
**जेथे**
**तो हा श्रीहरी पाहिला**
**डोळेभरी, पाहता पाहणे दुरी**
**सारुनिया**

तो हा श्रीहरी पाहिला डोळेभरी. तो हा श्रीहरी म्हणजे इथेच पाहिला. बाहेरही पाहिला आणि आतही पाहिला. आत पाहिल्यामुळे तो बाहेर आहे हे दिसू लागले. बाहेरही तोच आहे हे मला दिसायला लागले. तुकाराम महाराजांचा एक सुंदर अभंग आहे.

**“अवघी भुते साम्ये**
**आली देखिली म्या कई होती**
**विश्वास तो खरा मग**
**पांडुरंग कृपेचा**
**माझी कुणी न धरो शंका**
**ऐसे हो का निर्द्वंद्व**
**तुका म्हणे जे जे दिसे ते**
**ते वाटे मी ऐसे’’**

सर्व ठिकाणी मीच दिसायला लागलो. आतमध्येही तोच व बाहेरही तोच. बाहेर जो आहे तोच या ठिकाणी मी रूपाने आहे. असे हे सगळे गणित आहे. अध्यात्माचे हे जे गणित आहे ते एका अर्थी समजायला सोपे आहे व एका अर्थी ते समजायला कठीण आहे. समजायला सोपे आहे ते सद्‌गुरुंचे मार्गदर्शन असेल आणि समजायला कठीण असेल, तर ते सद्‌गुरुंचे मार्गदर्शन नसेल.

# देह हा परमार्थाचे साधन समजावा



संतांचे काम तुम्हाला देहबुद्धीपासून सोडविणे हे आहे; तुम्हाला मुलगा देणे, तुमचे दुखणे बरे करणे. म्हणजे विषय देणे, हे नव्हे. जो जो परमार्थाला लागावे तो तो देहबुद्धी तिथून ओढण्याचा जास्त जास्त प्रयत्न करते. विद्येची बुद्धी ही देहबुद्धीला धरून आहे; ती मारून आपण शुद्ध केली पाहिजे. याकरिता भगवंताच्या स्मरणासारखा दुसरा उपाय नाही. कुत्रा हा आपल्याला रात्रीच्या पहाऱ्यासाठी उपयोगी पडतो. पण तो कितीही चांगला आणि उपयोगी असला, तरी आपण त्याला पानात जेवायला घेऊन बसत नाही. त्याप्रमाणे देहाचेही आहे. आतल्या खोबऱ्याच्या रक्षणाकरिता ज्याप्रमाणे करवंटी, त्याप्रमाणे देहाला परमार्थाकरिता साधन मानावे. पण मनुष्य ‘हा देहच मी आहे ’, असे मानून व्यवहार करतो. वास्तविक, आपण देहापासून निराळे आहोत असे पदोपदी दाखवीत असतो; माझा हात, माझा पाय, माझा डोळा, माझे मन फार काय, माझा जीव असेही म्हणतो; पण वागतो मात्र ‘मी तोच आहे’ असे समजून. देहाशी संबंध जास्त येईल असेच आपण भगवंताजवळ मागतो; असे न करावे. आपल्या देहावरचे प्रेम कमी होण्यासाठी, दुसऱ्यावर प्रेम करायला लागावे. प्रेम बसायला आपल्याला आपल्यासारखाच देहधारी लागतो. कुत्रे रडत असले तरी आपल्याला नाही वाईट वाटत; पण एखादे लहान मूल रडत असले तर वाईट वाटते. देवावर प्रेम करायला, देवाला आपल्यासारखाच देहधारी कल्पावा लागतो. म्हणून, आपले देहावरचे प्रेम कमी व्हायला, देहबुद्धी कमी व्हायला, सगुणमूर्तीचे, सद्‌गुरूचे ध्यान करावे लागते. ते जसजसे दृढ होत जाईल, तसतसे आपण स्वतःला विसरून जातो आणि आपण देहाच्या पलीकडे गेलो, म्हणजे सद्‌गुरूचे खरे स्वरूप हे देहातीत आहे असे प्रत्ययाला येते. देहबुद्धी नष्ट होईल तसतशी सद्‌गुरूची खरी ओळख होईल. ज्याने देहाभिमान नष्ट केला त्याचा मोठा ज्ञानीसुद्धा हेवा करतो. ‘मी देह’ म्हणावे, यापलीकडे दुसरे अज्ञान कोणतेही नाही. मी भगवंताचा असून देहाचा म्हणणे यासारखे दुसरे खोटे नाही. प्रपंचात संकटे येतात, तरी पण तो सोडावासा वाटत नाही; याहून भगवंताची माया ती कोणती? अतिसहवासामुळे देहाचे ममत्व सुटत नाही. परमात्म्याचा सहवास, उदाहरणार्थ, देवाला जाण्याचा वा जप करण्याचा नेम केला, म्हणजे देहाचे ममत्व थोडे थोडे कमी होते. देहाच्या सहवासाने आपण देहाचे होतो, नामाच्या सहवासाने आपण परमात्म्याचे होऊ.



अध्यात्म
**ब्रह्मचैतन्य**
**श्री गोंदवलेकर महाराज**

**तात्पर्य : भगवंताच्या स्मरणामध्ये देहबुद्धीचे मरण आहे.**

## सुसंगती सदा घडो

सुसंगती सदा घडो सुजन वाक्य कानी पडो
कलंक मतीचा झडो विषय सर्वथा नावडो
सदन्घ्री कमळी दडो मुरडीता हटाने अडो
वियोग घडता रडो मन भव्त्चरीत्री जडो

न निश्चय कधी ढळो कुजनविघ्नबाधा टळो
न चित्त भजनी चळो मतीस दुष्त मार्गे वळो
स्वतत्व हृदया कळो दुरभिमान सारा गळो
पुन्हा न मन हे मळो दुरित आत्मबोधे जळो

नजे प्रियस दोष ते प्रियस दोषही चांगले
स्वतोक पितरा रुचे जरी हि कर दमी रांगले
तुलाची धरी पोटीशी कशी तदा यशोदा बरे
जरी मळवीशी रजो मलीन काय तू अंबरे

पिता जरी विटे विटोन जननी कुपित्री विटे
दया मृतर सार्धधी नकुल कःजले त्या किटे
प्रसादपट झाकिती परीपरा गुरुचे थीटे
म्हणोनी म्हणती भले न ऋण जन्मदेचे फीटे

कृतात्त कटका मल ध्वज जरा दिसो लागली
पुरःसर्गता स्वये झगडता तनु भागली
सहाय दुसरा नसे तुज विणे बळे आगळा
लहू जरी उताविळा स्वरी तो कापितो आगळा

दया मृतघना अहो हरीवळा मयुराकडे
रडे शिशुतया सी घे कळवळोनी माता कडे
असा अतिथी धार्मिकस्तुतपदा कदा सापडे
पुन्हा जड भवारणवी उतरिता नदा सापडे

आई व तिचे मूल यांचे प्रेमसंबंध कोणत्या प्रकारचे असतात यावर प्रकाश टाकणारे केकावलीतले श्लोक, याच संदर्भात केकावलीच्या शेवटी ११८ व ११९ या केकांतून मोरोपंतानी परमेश्वराकडे केलेले अखेरचे मागणे मला पसायदानाइतके महत्त्वाचे वाटते. हे मागणे घरोघरी होणाऱ्या रोजच्या प्रार्थनेत जमा व्हावे अशा तोडीचे आहे. ‘सुसंगती सदा जडो, सुजन वाक्य कानीं पडो’ या चरणाने सुरू होणारी ११८वी केका व ‘न निश्चय कधी ढळो, कुजनविघ्नबाधा टळो’ या चरणाने सुरू होणारी ११९वी केका महाराष्ट्रात अनेकांच्या तोंडी आहे.

जेव्हा मानवी जगण्यातला व त्याच्या प्रयोजनातला सुसंवाद तुटतो तेव्हा हे जगणे अर्थहीन होते. जगण्यासाठी संघर्ष अत्यावश्यक आहे. मात्र संघर्षातली मानवी मने जोडण्यासाठी सुसंवादही तितकाच गरजेचा आहे. मोरोपंत जो सुसंवाद आपल्या युक्तिवादातून परमेश्वराशी घडवून आणतात, तो मानवी मनाचे प्रयोजन दाखविणारे चित्र डोळ्यापुढे उभे करतो. आज आपला हा संवाद सतत तुटत चाललेला आहे. एकदा संवादाचे महत्त्व पटले की आपल्या जगण्याची शैली अचूक वळणाने जाते. मोरोपंतांनी ती आर्ततेने दाखवून दिली.

सुसंगती आणि सुजन वाक्य हे तर रोजच्या जगण्याचे प्रयोजन आहे. आम्हाला संगती आणि विसंगती यांचे अतूट नाते वेगळे करता येत नाही आणि यासाठी सुजन वाक्याची गरज आहे. वाक्य हे कर्ता, कर्म आणि क्रियापद यांनी पूर्ण होते. यातले एकही पद कमी झाले तर वाक्याला अर्थ राहत नाही. पूर्ण वाक्य आपल्या पूर्ण जगण्याचे मर्म आहे. असे वाक्य दुर्जनही स्वीकारू शकतो मात्र त्याच्याजवळ सुसंगती नसते. सुसंगती आणि पूर्ण वाक्य यांची जोड हेच सज्जनाचे लक्षण आहे. आज आपण या वळणाला पारखे झाल्याने आपल्या जगण्यात संघर्ष येतो; सुसंवाद येत नाही. सुजन वाक्याच्या उच्चाराने जेव्हा आपले कान तृप्त होतात तेव्हा त्या वाक्याचा पूर्ण अर्थ आपल्या हृदयात स्थिर होतो. मग या उच्चाराला आचाराची जोड मिळते. जगण्याला दिशा सापडते. यंत्रवत जगण्याचा हेतू शून्य रटाळपणा अचूक मार्गदर्शनातून बाजूला काढता येतो. मोरोपंतांनी आपल्या पद्यातून हे मागणे परमेश्वराकडे केले. आपले प्रयोजन वेगळे असेल मात्र मार्ग एकच आहे. इथे तपशिल वदलला तरी तत्व तेच आहे.

मला सरळ मार्गाने जायचे आहे. वळणावर थांबून पुन्हा तोच सरळ मार्ग तोडायचा आहे. मी आखलेली सरळ रेषा इतरांनाही नागमोडी करता येणार नाही; कारण तिचा प्रारंभबिंदू सुजन वाक्यातून ठळक झालेला आहे. मोरोपंताची कविता आणि त्यातली आत्मपरता ही आजच्या आत्मपरतेपेक्षा वेगळ्या प्रकृतीची असली तरी ती आपल्या आजच्या जगण्याला सतत जाणवावी, असेच तिचे स्वरूप आहे. त्यातली मनाची आर्तता सतत प्रकट होते. आपल्या उतार वयात आणि उतरती कळा लागताना ही उपदेशप्रधान कवितासुता वयाने व गुणाने प्रौढ होऊन आपल्याला नवा आधार देते. हा उपदेश योग्यस्थळी पडणे व तेथेच स्थिर होणे तुमच्या कालोचित जगण्याशी निगडित आहे. इथे कवीची औचित्यपूर्ण प्रार्थना हीच तुमच्या रोजच्या जगण्याची अंतर्मुखता असते. मी जगण्याचा मार्ग शोधला आहे. त्यातली बाळबोध सरळ रेषा स्थिर आहे. त्यावरच माझे जाणे-येणे क्रमबद्ध झाले आहे. वाद, संवाद आणि सुसंवाद तसेच गती, विसंगती आणि सुसंगती या रेषेला छेद देणारी नसून आपल्या सुजन वाक्याची पूर्तता करणारी आहेत.


# आजोळच्या संस्कृतीची शिदोरी

नुकत्याच मे महिन्याच्या सुट्ट्या सुरू झाल्या आहेत. मे महिना म्हटलं की डोळ्यांसमोर येतं ते आजोळ म्हणजेच मामाचं गावं.

प्रत्येक मुलांच्या जिव्हाळ्याचा विषय. पूर्वी एखाद्या मौंजीबंधन, लग्नप्रसंग व मे महिना असे वर्षातून एकदाच आजोळी जायला मिळत असे. “झुक झुक आगीनगाडी धुरांच्या रेघा हवेत काढी”... असे गाणे म्हणत त्या दिवसाची वाट बघण्यात पूर्ण वर्ष निघून जायचं. आजही आजोळ आठवलं की डोळ्यांसमोर येते ती आजोळची अल्हाददायी पहाट. पहाटे पहाटे जाग यायची तीच मुळी आजी म्हणायची त्या ओव्यांनी. एकत्र कुटुंबपद्धती असल्याने घरामध्ये पंचवीस-तीस जणांचा राबता असायचा. आजी नेहमी चार वाजता उठायची. उठल्यावर अंगणात सडा सारवण करून त्यावर सुंदर रांगोळी काढली जायची. अंघोळ वैगेरे आटोपून अंगणातील तुळशी वृंदावनातील तुळशीची पूजा करून ती जात्यावर बसत असे, तिच्यासोबत मामी पण बसत असे आणि दोघी मिळून ओव्या म्हणत असत. पहाटे आजीच्या ओव्यांनी जाग येणं म्हणजे पूर्ण दिवस मन प्रसन्न राहणं.

**पहिली माझी ओवी गं,**
**हात खुंट्याला लाविला**
**देव तो विठ्ठल पहिला**
**ओवीला गाईला !!**
**दुसरी माझी ओवी गं**
**जात्याच्या पाळीला**
**ओवीला गं लेक बाई**
**माझ्या वनमाळीला!!**

या ओव्या ऐकता ऐकता आम्हाला जाग यायची. त्या ओव्यांमधून देवांची चरित्रे, ऐतिहासिक गोष्टी यांचे देखील वर्णन व्हायचे. अंघोळी वगैरे आटोपून देवघरात सर्व आरतीला जमायचे. तोवर आजोबांची पूजा झालेली असायची. आरती झाल्यावर सर्वजण एकत्र बसून न्याहारी करायचो. नंतर मामा आम्हाला गाव फिरवायला नेत असे. गड किल्ले करायला, विहीरीत पोहायला शिकवत असे. आता मात्र गेले ते दिवस राहिल्या त्या आठवणी असे म्हणण्याची वेळ आली आहे. आता विभक्त कुटुंब पद्धती आल्याने आजोळ पण विभक्त झाले आहे. मातीचे अंगण जाऊन तिथे काँक्रीटचे अंगण झाले. पहाट आता सकाळी सहा वाजता होते. जात्याचा उपयोग फक्त लग्नप्रसंगी होतो. आता पहाटेच्या ओव्यांऐवजी भांड्यांच्या आवाजाने जाग येते. सुट्ट्यांमधले मामाचे गाव हरवत चालले आहे. त्यातील मायेचा ओलावा संपत चालला आहे. आता आम्ही सुट्ट्या लागण्याआधी टूर्स पॅकेज बुक करतो. यावर्षी आम्ही बाहेर फिरायला जाणार आहोत. आम्ही पुढच्या वर्षी येतो असे कारणं सांगतो. वाट पाहत असलेल्या वृद्ध डोळ्यांतले पाणी जर आम्हाला दिसत नाही तर त्या कंपित आवाजातल्या ओव्या आमच्या मुलांना कशा साद घालणार? कशी आमच्या मुलांना नाती काय असतात, गावाकडची संस्कृती काय असते, एकत्र कुटुंबपद्धती काय असते हे कळणार. फक्त पुस्तकात वाचून हे ज्ञान उपयोगाचे नाही, तर त्याला मायेचा स्पर्श सुद्धा असायला हवा. तरच ते हृदयाच्या कुपीत जतन करता येईल आणि त्याचा सुगंध पिढी दर पिढी वाढत राहील. काळानुसार जीवनशैली बदलली आहे हे अगदीच मान्य आहे पण जेव्हा सुट्ट्या असतात तेव्हा सर्वांनी नियोजन करून एकत्र जमून नात्यांमधील मायेचा ओलावा टिकवून ठेवणे गरजेचे आहे. नाहीतर पुढील पिढीला फक्त आई, बाबा आणि मुलगा/मुलगी हीच नाती फक्त माहीत होतील. तसेच नुसते एकत्र जमून मोबाइलमध्ये रमणे हा देखील त्याच्यावरचा उपाय नाही. तर सर्वांनी जेवण, चहा, न्याहारी एकत्र करत असताना प्रत्येकाने आपापल्या लहानपणाचे गोड अनुभव सांगितले पाहिजेत. तसेच मोठ्यांचा आदर व लहानांवर प्रेम कसे केले जाते हे आपल्या वागण्यातून दाखवून दिले पाहिजे. मोठ्यांना उलट बोलणे, कसे चुकीचे आहे हे समजावून सांगितले पाहिजे. हीच तर आपली भारतीय संस्कृती आहे. आपल्या संस्कृतीचे पाश्चिमात्य देशांनी अनुकरण करायला घेतले आहे मग आपली ही संस्कृती आपल्या लहानांपर्यंत पोहोचवणे आपली जबाबदारी नाही का? प्रत्येकाने हे लक्षात ठेवले पाहिजे की लहान मुले मोठ्यांचे अनुकरण करतात तेव्हा आज तुम्ही जसं त्यांच्या समोर वागाल ते सुद्धा तुमच्यासोबत तसेच वागतील. कित्येक घरांमध्ये सकाळी उठल्यावर मोठ्याने इंग्रजी गाणी लावली जातात आणि ही मंडळी अभिमानाने सांगतात की आमची मुले इंग्रजी गाणी, इंग्रजी सिरीयलच पाहतात. कसला वृथा अभिमान म्हणावा हा... आणि जेव्हा हीच मुले नोकरीनिमित्त परदेशी जाऊन स्थायिक होतात तेव्हा कुठे जातो हा अभिमान? आज पाश्चिमात्य देशांची सकाळ “ओंकार” उच्चाराने होते. आपल्याकडे जरी पहाटेच्या ओव्या ऐकू येत नसल्या तरी प्रत्येक घराघरांत किमान “कराग्रे वसते लक्ष्मी, करमध्ये सरस्वती। करमूले तु गोविन्दः प्रभाते करदर्शनम्।” हा श्लोक म्हटला गेला पाहिजे. लहान मुलं मातीसारखी असतात त्यांना तुम्ही जसं घडवाल तशी ती घडतील. लहान मुलांची आकलन शक्ती जास्त असते तुम्ही सतत त्यांना श्लोक, स्तोत्र ऐकवत राहिलात किंवा तुम्ही स्वतः म्हणत राहिलात तर ती मुले लवकर आत्मसात करतात. अलीकडे तर संध्याकाळच्या वेळी पाढे, गोष्टी सांगणे हे एखाद दुसरा अपवाद वगळता पूर्णतः बंद झाल्या आहेत.





मनाचा गाभारा
**अर्चना सरोदे**

सात वाजता सिरीयल चालू होतात म्हणून आम्ही देवापुढे दिवा सुद्धा साडे सहालाच लावतो. मग मला सांगा मुलांनी, नातवंडांनी पुढे तीच परंपरा चालू ठेवली, तर यात दोष त्यांना का म्हणून द्यायचा. ते तेच करतात जे त्यांनी लहानपणापासूनच बघितलं आहे. आजोळच्या संस्कृतीच्या शिदोरीची चव ज्यांनी ज्यांनी चाखली त्यांनी पुढच्या पिढीला सुद्धा त्यातील गोडी चाखायला द्यावी... निदान प्रयत्न तरी करायला हवाच!

# सजग समाज निर्मितीचे स्वप्न

## डॉ.ज्योती मेटे | शिवसंग्राममध्ये युवकांचा प्रवेश

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:लोकनेते विनायकराव मेटे साहेब यांच्या विचारांनी प्रेरित होऊन आज शिवसंग्राम भवन येथे शिवसंग्राम अध्यक्ष डॉ ज्योती विनायकराव मेटे यांच्या प्रमुख उपस्थितीत शहरातील असंख्य युवकांनी शिवसंग्राम मध्ये जाहीर प्रवेश केला असून येणाऱ्या काळात शिवसंग्रामच्या माध्यमातून युवक,तरुण ,विद्यार्थी आणि बेरोजगार यांच्यासाठी लढा देण्याचे आणि त्यांच्या समस्या सोडवण्याचा निर्धार यावेळी युवकांनी केला या प्रसंगी शिवसंग्राम अध्यक्ष डॉ ज्योती विनायकराव मेटे, शिवसंग्रामचे जिल्हा सरचिटणीस अनिल घुमरे पाटील, शहराध्यक्ष सुहास पाटील, उपाध्यक्ष रामदास नाईकवाडे,धर्मराज मागदे सर , मनोज जाधव, विद्यार्थी आघाडीचे कार्याध्यक्ष ओंकार पाटील, अशोक लोकरे, शेषेराव तांबे, कैलास शेजाळ आदी. उपस्थित होते.

डॉ. ज्योती मेटे यांच्या उपस्थितीत आज असंख्य युवकांनी शिवसंग्राम मध्ये जाहीर प्रवेश केला यावेळी मंचावर शिवसंग्राम चे विविध पदाधिकारी उपस्थित होते. हा पक्षप्रवेश शिवसंग्राम विद्यार्थी आघाडीचे कार्याध्यक्ष ओंकार पाटील यांच्या नेतृत्वात करण्यात आला असून यावेळी लोकनेते विनायकराव मेटे साहेब यांनी त्यांच्या हयातीमध्ये युवक, तरुण, विद्यार्थी आणि बेरोजगार यांच्यासाठी केलेले कार्याला उजाळा देताना डॉ. ज्योती मेटे म्हणाल्या की, मेटे साहेबांनी त्यांच्या हयातीमध्ये अनेक तरुणांना रोजगार मेळाव्यांचे आयोजन करून त्यांच्या हाताला काम दिले त्याचबरोबर पोलीस भरतीची वयोमर्यादा वाढवण्याचे काम केले, एमपीएससीच्या विद्यार्थ्यांना दर रविवारी पुणे येथे मोफत जेवणाची व्यवस्था केली आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे सजग समाज निर्मितीसाठी तरुणांनी व्यसनांपासून दूर राहावे यासाठी व्यसनमुक्तीचा लढा उभा केला या सर्व कार्यांनी प्रेरित होऊन आज शिवसंग्राम मध्ये युवक मोठ्या प्रमाणात सामील होत आहेत याचा मनस्वी आनंद होत आहे. आपण सर्व एकत्रितपणे मेटे साहेबांचे सजग समाज निर्मितीचे स्वप्न पूर्ण करू आणि शिवसंग्राम तळागाळापर्यंत पोहोचविण्यासाठी कार्य करू अशी साद त्यांनी यावेळी घातली. यावेळी प्रवेश केलेल्या युवकांना आणि विद्यार्थ्यांना विद्यार्थी आघाडीच्या विविध पदांवर जबाबदारी देण्यात आली.



### विद्यार्थी आघाडीची कार्यकारणी जाहीर

या पक्षप्रवेशा वेळी विद्यार्थी आघाडीची कार्यकारणी निवडण्यात आली यात शिवसंग्राम विद्यार्थी आघाडी जिल्हा सरचिटणीस पदी तुषार डोळे, जिल्हा उपाध्यक्षपदी वैभव घुमरे, अनिकेत साळवे, शहराध्यक्षपदी आकाश हाजारे, शहर उपाध्यक्षपदी अहिलेश वाघमारे, शहर सचिव पदी उदयराज कुलकर्णी, शहर सहसचिव पदी प्रद्युम्न परजणे यांची निवड करण्यात आली.

# पाटोद्यात संभाजी राजांना अभिवादन

## नियोजन:छत्रपती संभाजी महाराज जयंती



पुण्यभूमी प्रतिनिधी

पाटोदा :हिंदवी स्वराज्याचे दुसरे छत्रपती, पराक्रमी योद्धा आणि राष्ट्राभिमानाचे प्रतीक छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती पाटोदा शहरात मोठ्या उत्साहात आणि दिमाखात साजरी करण्यात आली. शहरातील विविध संघटनांच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.जयंतीनिमित्त संध्याकाळी शहरातून भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले. मिरवणुकीत भगवे ध्वज आणि संभाजी महाराजांचे प्रतिमाचित्र हाती घेतलेल्या युवकांनी सहभाग घेतला. संपूर्ण वातावरण ‘छत्रपती संभाजी महाराज की जय’च्या घोषणांनी दुमदुमून गेले होते.

कार्यक्रमात स्थानिक मान्यवर,सामाजिक कार्यकर्ते, विद्यार्थी आणि महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या. व्यासपीठावर वक्त्यांनी संभाजी महाराजांच्या शौर्य,बलिदान आणि धर्मनिष्ठेचा गौरव करताना त्यांच्या जीवनचरित्रावर प्रकाश टाकला. त्यांच्या विचारांचे आजच्या पिढीने पान २ वर

# गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ

## उपक्रम:डिंगाबर तपसेंनी राबविला कार्यक्रम

पुण्यभूमी प्रतिनिधी

केज:आज दिनांक १५ मे २०२५रोजी मौजे चंदन सावरगाव येथेसकल मराठा सेवक मनोज दादा तरंगे पाटील यांचे कट्टर समर्थक डिंगाबर श्रीहरी तपसे यांच्यावतीने इयत्ता दहावी तसेच बारावी परीक्षेमध्ये मध्ये प्रथम द्वितीय तृतीय क्रमांक मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते . या कार्यक्रमाच्या .अध्यक्षस्थानी चंदन सावरगाव चे सरपंच जालिंदर दळवी तर प्रमुख अतिथी म्हणून छावा संघटनेचे जिल्हाध्यक्ष शिवाजी दादा ठोंबरे , पैठण केंद्राचे केंद्रप्रमुख डॉ . रामकिशन मुळे , उमरी शाळेचे मुख्याध्यापक राजेभाऊ इंगळे ,चंदन सावरगावचे उपसरपंच बालासाहेब तपसे, उद्योजक राजेभाऊ तपसे , राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष शंकर तपसे, तसेच लालबहादूर शास्त्री विद्यालय चंदनसावरगाव येथील श्री खुळे सर व सपाटे सर उपस्थित होते .या कार्यक्रमाचे प्रस्ताविक श्री खुळे सरांनी केले तर इयत्ता अकरावीची परीक्षा ऑनलाईन पद्धतीने कशाप्रकारे पार पडणार आहे याबद्दल सविस्तर मार्गदर्शन पैठण केंद्राचे केंद्रप्रमुख डॉ . रामकिशन मुळे यांनी केले .

यាप्रसंगी बारावी व दहावी परीक्षेतील खालील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.श्रद्धा सुधीर तपसे अश्विनी दत्तात्रेय तपसे सृष्टी उत्तरेश्वर तपसे साक्षी परमेश्वर धुमक सुप्रिया दिलीप घुले भक्ती महादेव काळे योगेश्वरीराजेभाऊ तपसे अश्विनी दत्तात्रय तपसे एमपीएससी परीक्षेत गटविकास पान २ वर



# कळंबमध्ये रुग्णांना मिळाला दिलासा

## समारंभ:कोठावळे हॉस्पिटलचे उदघाटन

पुण्यभूमी प्रतिनिधी

कळंब:शहरातील आरोग्यसेवा अधिक सशक्त आणि सुलभ व्हावी या उद्देशाने डॉ. विपिन पद्माकर कोठावळे एम.बी.बी.एस.डी. ऑर्थोअस्थिरोग तज्ञ यांच्या कोठावळे हॉस्पिटल ढोकी रोड कळंब येथे नव्या रुग्णालयाचे उद्घाटन ह.भ.प.श्री. प्रकाश महाराज बोधले अध्यक्ष,अखिल भारतीय वारकरी संप्रदाय आणि ह.भ.प. विष्णू महाराज कबीर कबीर मठ पंढरपूर यांच्या शुभहस्ते पार पडले या उद्घाटन सोहळ्याला धाराशिव लोकसभा मतदारसंघाचे खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर,कृषी उत्पन्न बाजार समिती कळंबचे सभापती शिवाजी आप्पा कापसे,शिवसेना नेते अजित दादा पिंगळे,लक्ष्मण हुलजुते,रोहन पारेख,कोल्हे नाना,बाळकृष्ण तांबारे, डॉ. रामकृष्ण लोंढे,डॉ.रमेश जाधवर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते उद्घाटनप्रसंगी मार्गदर्शन करताना प्रकाश महाराज बोधले म्हणाले, रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा मानून कार्य केले, तर यश निश्चित आहे विष्णू महाराज कबीर यांनी शुभाशीर्वाद देत डॉ.कोठावळे यांना उज्ज्वल वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या खासदार ओमप्रकाश राजे निंबाळकर यांनी उपस्थितांना संबोधित करताना म्हटले डॉक्टर हे खऱ्या अर्थाने देवाचे रूप असतात सामाजिक बांधिलकी जपत रुग्णसेवा करणे हेच आजच्या काळाचे पान २ वर



# माध्यमिक परीक्षेत मिळविले यश

## अभिनंदनिय:आदित्य उपाडेचा शाळेकडून सत्कार



पुण्यभूमी प्रतीनीधी

माजलगाव:नागडगावचा सुपुत्र आदित्य मच्छिंद्र उपाडे याने आपल्या प्रतिकूल परिस्थितीवर मात करून जिद्द व चिकाटीच्या जोरावर दिनांक १३ मे २०२५ रोजी. लागलेल्या दहावी बोर्डाच्या निकालात विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यात आपले नाव कोरले व मोठ यश संपादन केले. आदित्य उफाडे स्वामी विवेकानंद विद्यालयाचा विद्यार्थी असून त्यांन इयत्ता दहावी च्या बोर्ड परीक्षेत ८६ टक्के घेऊन विद्यालयात एक वेगळी ओळख निर्माण केली आहे.

आदित्य मच्छिंद्र उपाडे सह सर्व विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झालेल्या यशस्वी विद्यार्थ्यांचे महाविद्यालयाचे मुख्याध्यापक जगताप सर, करांडे, माने, थेटे, रकटे, खडके, बनसोडे, राठोड सह सर्व शिक्षक शिक्षिका सर्व यांच्या वतीने विशेष सन्मानित करण्यात आले. व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या या यशाबद्दल संस्थेचे सचिव राहुल काका जगताप यांच्या वतीनेही सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक करून अभिनंदन करण्यात आले.आदित्य उफाडे याच्या या यशाबद्दल त्याचे सर्व स्तरातून विशेष कौतुक करून अभिनंदन करण्यात येत आहे.

# लिट्ल फ्लॉवर इंग्लिश स्कूलचे यश

## अभिनंदनिय:यशाची परंपरा ठेवली कायम

पुण्यभूमी प्रतिनिधी

पाटोदा: शहरातील लिट्ल फ्लॉवर इंग्लिश स्कूल ने यंदाही दहावीच्या परीक्षेत शंभर टक्के निकालाची उज्ज्वल परंपरा कायम राखत तालुक्यातील गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे उत्तम उदाहरण सादर केले आहे. सलग तेराव्या वर्षी मिळवलेली ही यशस्वी कामगिरी तालुक्यात चर्चेचा विषय ठरली आहे.

शाळेतील यशस्वी निकालामागे विद्यार्थ्यांची मेहनत, पालकांचा पाठिंबा आणि शिक्षकांचे समर्पित मार्गदर्शन हे घटक कारणीभूत ठरले आहेत. यंदाच्या निकालात जानकी अभिजित वैद्य हिने ९१.६%, असीम समीर सय्यद याने ९०.६%, तर ओम भाऊसाहेब सावंत याने ९०% गुण मिळवत आघाडी घेतली आहे. तसेच सुवेज पठाण आणि जावळे आयुष यांनी ८६% गुण मिळवून इंग्रजी माध्यमातून तालुक्यात पहिल्या पाच गुणवंतांमध्ये स्थान मिळवले.दगडे अक्षरा, कोकाटे शिवतेज, भोसले अभय, मौला औझफ, मौला आहद या विद्यार्थ्यांनीही गुणवत्ता यादीत आपले स्थान निश्चित करत शाळेच्या यशात मोलाची भर घातली आहे.

या गौरवशाली कामगिरीबद्दल संस्था प्रमुख पठाण सर, शालेय प्रमुख सीमा माळी मॅडम, वसुंधरा एकबोटे मॅडम, सानप कृष्णा सर, घोलप सर पान २ वर



गेवराई:येथील बाळासाहेब खंडागळे यांच्या निवासस्थानी आमलेश जावळकर यांनी सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांचा सन्मान करताना शिवकन्या खंडागळे, विनायकराव खंडागळे, ताराबाई खंडागळे, गोपाळ सपकाळ, स्नेहल सपकाळ आदी.

# इंजिनिअर तुपाशी,लाभार्थी उपाशी

## बोंबला:केज पंचायत समितीत चाललय काय?

पुण्यभूमी प्रतिनिधी

केज:पंचायत समितीच्या घरकुल विभागाला असलेले इंजिनिअर मालामाल मात्र लाभार्थी यांचे बेहाल या कंत्राटी इंजिनिअरचा मनमानी कारभार सुरू आहे हे कंत्राटी इंजिनिअर फक्त पैसे गोळा करण्यात दंग आहेत यांना सर्व सामान्य लोकांच काहीच घेणेदेण नाही एका घरकुलाला दहा हजार मागतात केज पंचायत समितीच्या कोणतेच अधिकारी या कडे लक्ष देत नाहीत कारण केज पंचायत समिती मध्ये काय चाललंय ते जर बिडीओ पान २ वर



## समाजवादी पक्ष | परळी नगर परिषदेला निवेदन

# महिलांसाठी शौचालयांची उभारणी करावी

पुण्यभूमी प्रतिनिधी

अंबाजोगाई:शहरातील महिलांना सार्वजनिक शौचालयांच्या अभावामुळे मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर समाजवादी पार्टी, महाराष्ट्र प्रदेशच्या वतीने बीड जिल्हा महिला आघाडीच्या अध्यक्षा सालेहा जिलानी शेख यांनी अंबाजोगाई नगरपरिषदेला निवेदन सादर केले.

या निवेदनात शहरातील स्व.रा.ती. रुग्णालय, बसस्थानक, पाटील चौक, भाजी मंडी पुलासमोर, यशवंतराव चव्हाण चौक, योगेश्वरी शाळा, गोदावरी कुंकुलोळ कॉलेज, भगवानबाबा चौक, रमाबाई चौक, राजीव गांधी चौक, एस.टी. डेपो, वडारवाड तसेच रायगड नगर, संत कबीर नगर, अण्णाभाऊ साठे चौक, रविवारी पेठ, करबला वेस, काशी विश्वनाथ स्मशानभूमी या ठिकाणी सुलभ शौचालये बंद असल्याचे निदर्शनास आणून दिले.

शहरात महिलांसाठी स्वतंत्र व सुलभ शौचालयांची संख्या अत्यल्प असून, जी आहेत तीही जुनी झालेली वापरा योग्य नाहीत, अशीच परिस्थिती जिल्हाभरामध्ये आहे त्यामुळे सर्व सार्वजनिक ठिकाणी नवीन शौचालयांची निर्मिती करावी अशी मागणी सालेहा शेख यांनी निवेदनाद्वारे केली आहे.या निवेदनावर समाजवादी पक्षाचे प्रदेश सचिव ॲड. शिवाजी कांबळे यांचीही स्वाक्षरी असून, नगरपरिषदेला नव्याने शौचालयांची उभारणी करण्याची मागणी करण्यात आली आहे.



# अमृता लखापतींनी घेतला पदभार

## वागत:सहाय्यक अभियंता म्हणून रुजू



पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी:महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड (MSEDCL/महावितरण) च्या परळी उपविभागीय कार्यालयात आज, दि. १५ मे रोजी कु. अमृता संजय लखापती सहाय्यक अभियंता (वर्ग २) पदावर Graduate Engineer Trainee म्हणून रुजू झाल्या. प्रभारी उपकार्यकारी अभियंता अभिजीत राठोड यांनी त्यांना रुजू पान २ वर